। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २२० वा । सोमवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

नवीन कामगार कायदे.... लेख.. (पान २ वर)

'टॉय बँक' उपक्रमाला गती.. (पान ६ वर)

## २६ नोव्हेंबर २०२५ रोजी
# लातूर रक्तदान महोत्सवात



लातूर/प्रतिनिधी : संविधान दिनाचे औचित्य साधत लातूर शहरात आणि जिल्ह्यात

### सहभागासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचे आवाहन

वाढत्या रक्ततुटवड्याचा प्रश्न दूर करण्याच्या उद्देशाने लातूर शहरातील अकरा नामांकित सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन 'लातूर रक्तदान महोत्सव २०२५' चे भव्य आयोजन केले आहे. या महत्त्वपूर्ण उपक्रमात प्रत्येक लातूरकराने उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले असून, मानवसेवेच्या या महोत्सवाला व्यापक समाजाने साथ द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या रक्तदान महोत्सवाची घोषणा करताना जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे म्हणाल्या की, रक्तदान ही अनमोल देणगी असून एका रक्तपुंजातून अनेक जिवांचे प्राण वाचू शकतात. लातूर जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये वाढत्या शस्त्रक्रिया, प्रसूती, अपघातग्रस्त आणि गंभीर रुग्णांच्या उपचारांसाठी रोज मोठ्या प्रमाणात रक्ताची गरज भासते. त्यामुळं सुरक्षित रक्तसाठा निर्माण करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेणे अत्यावश्यक बनले आहे.

'रक्तवीर लातूर - गौरव लातूर' या प्रेरणादायी ब्रीदवाक्याने सजलेल्या या महोत्सवाचे आयोजन २६ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे. संविधान दिनाच्या दिवशी होणारा हा उपक्रम लोकशाही मूल्यांची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करणारा ठरणार आहे. रक्तदान महोत्सव लातूर जिल्हा न्यायालयातील गेट क्रमांक ३ येथे सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत पार पडणार असून इच्छुक नागरिकांनी या वेळेत रक्तदानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. रक्तदानासाठी आवश्यक सर्व वैद्यकीय सुविधा, सुसज्ज रक्तपेढ्या, अनुभवी डॉक्टर्स, नर्सिंग कर्मचारी आणि प्रशिक्षित स्वयंसेवकांची व्यवस्था आयोजक संस्थांकडून करण्यात आली आहे.




रक्तदान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची वैद्यकीय तपासणी तसेच नोंद प्रक्रिया सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण केली जाणार आहे. रक्तदानानंतर सहभागींना आवश्यक त्या सर्व सूचना व मार्गदर्शन प्रदान केले जाईल, असेही संस्थांनी स्पष्ट केले.

लातूरकरांनी संविधान दिनाचे औचित्य साधून आयोजित या रक्तदान महोत्सवात सहभागी होत 'रक्तवीर लातूर' बनावे आणि 'गौरव लातूर' ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून साकारावी, असे आवाहन जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे आणि आयोजक संस्थांकडून करण्यात आले आहे.

## न्यायमूर्ती सूर्य कांत भारताचे ५३ वे सरन्यायाधीश!





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी सोमवारी (२४ नोव्हेंबर) शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सूर्य कांत यांना सरन्यायाधीश पदाची शपथ दिली. न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्याकडे पुढील १५ महिने सरन्यायाधीशपदाचा कार्यभार असेल. मावळते सरन्यायाधीश भूषण गवई हे रविवारी (२३ नोव्हेंबर) सेवानिवृत्त झाले. त्यानंतर आता सूर्य कांत यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कलम ३७० रद्द करणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकत्व हक्कांवरील प्रकरणांच्या सुनावणीत त्यांचा सहभाग होता. सूर्य कांत यांचा शपथविधी ऐतिहासिक ठरला आहे. कारण या शपथविधी सोहळ्याला सात देशांचे मुख्य न्यायमूर्ती उपस्थित होते. भूतानचे मुख्य न्यायमूर्ती ल्योनपो नोरबू शेरिंग, केन्याच्या मूख्य न्यायमूर्ती मार्था कूमे, मलेशियाच्या संघीय न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती नलिनी पथमनाथन, मॉरीशसच्या मुख्य न्यायमूर्ती बीबी रेहाना मुंगली-गुलबुल, नेपाळचे मुख्य न्यायमूर्ती प्रकाश मान सिंह राऊत यावेळी उपस्थित होते. सूर्यकांत हे सरन्यायाधीश पदावर ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहतील. तब्बल १५ महिने त्यांच्याकडे हे पद असेल.

**जीवन-प्रवास**

सूर्यकांत यांचा जन्म १० फेब्रुवारी १९६२ रोजी हरियाणाच्या हिसार जिल्ह्यातील पेट्वर गावात एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला.

त्यांनी १९८१ मध्ये हिसार येथील सरकारी पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेजमधून पदवी संपन्न केली.

एलएल.बी. त्यांनी १९८४ मध्ये रोहतक येथील महर्षि दयानंद विद्यापीठातून घेतली.

**कायदेकारकीदारी व न्यायालयीन वाटचाल**

१९८४ साली त्यांनी हिसार येथील जिल्हा न्यायालयात वकिलीला सुरुवात केली, त्यानंतर १९८५ मध्ये चंदीगड येथील Punjab and Haryana High Court मध्ये कोर्टमध्ये प्रॅक्टिस करायला लागले.

२००० मध्ये हरियाणाच्या सरकारने त्यांना अधिवक्ता-साधारण (Advocate General) म्हणून नियुक्त केले.

९ जानेवारी २००४ रोजी त्यांची स्थायी न्यायाधीश म्हणून नियुक्ती पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयात झाली.

५ ऑक्टोबर २०१८ रोजी त्यांना Himachal Pradesh High Court च्या मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्यात आले.

२४ मे २०१९ रोजी त्यांची Supreme Court of India मध्ये न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली.

३० ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांची भारताचे ५३वे मुख्य न्यायाधीश (Chief Justice of India - CJI) म्हणून नियुक्ती करण्यात आली; आणि २४ नोव्हेंबर २०२५ रोजी शपत घेतली आहे.

**वैशिष्ट्यपूर्ण योगदान**

न्यायालयीन कारकीर्दीत त्यांनी विधानसंहिता ३७० (Article 370) ची रद्दीकरण, Pegasus स्पायवेअर प्रकरण, निवडणूक सुधारणा असे अनेक महत्त्वपूर्ण प्रश्ने हाताळली आहेत.

## गं. भा. विजयाबाई हलमडगे यांचे वृध्दपकालाने निधन



**औसा/प्रतिनिधी :** औसा येथीलविरशैव समाजाच्या वयोवृध्द महीला व विरभद्रेश्वरचे शिक्षक चंद्रशेखर गुराप्पा हलमडगे यांच्या मातोश्री, येणगुर येथील शेतकरी गुरप्पा हालमडगे यांच्या पत्नि विजयाबाई गुरप्पा हलमडगे यांचे औसा येथील शिवगीरी कॉलनी येथे रहाते घरी अल्पशा वृध्दपकालीन आजाराने वयाच्या७८व्या वर्षी रविवार दि.२३/११/२०२५रोजी रात्री ९वा.निधन झाले. औसा येथील विरभद्रेश्वर शाळेतील चंद्रशेखर गुराप्पा शिक्षक हलमडगे सरांच्या मातोश्री तर सौ. निलावती चंद्रशेखर हलमडगे मॅडमच्या सासुबाई होत्या.त्यांच्या पच्छात २ मुले १ मुलगी नातवंड असा परिवार आहे. सोमवार दि.२४/११/२०२५रोजी सकाळी ११वा गुळमठ स्मशान भुमित अत्यसंस्कार करण्यात आले हलमडगे यांना विरशैव समाज व श्री विरभद्रेश्वर प्राथमिक विद्यालय कडुन भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली अंत्य यात्रेत शिक्षक,शिक्षीका समाजातील प्रतिष्ठीत नागरीक ,व्यापारी,कॉलनीतील नागरीक येणेगुर येथील पाहुणे आदी मोठ्या संखेने उपस्थित होते.

## निलंगा शहराच्या विकासाचा जाहीरनामा काँग्रेसकडून प्रसिद्ध



**निलंगा/अयुब बागवान :** स्वच्छ, सुंदर आणि भयमुक्त शहर आदी विकासाच्या संकल्पना डोळ्यासमोर निलंगा शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने निलंगा शहराच्या विकासाचा जाहीरनामा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हमीद शेख, पॅनल प्रमुख अजित नाईकवाडे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ अरविंद भातांब्रे, तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, माजी प.स.सभापती अजित माने यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार परिषद घेऊन जाहीर करण्यात आला.काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे, होतकरू विद्यार्थ्यांना अभ्यासिका व तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, शहरातील नाली व रस्त्यांची कामे तात्काळ मार्गी लावणार, दररोज व नियमित पाणीपुरवठा, शहरातील सर्व चौकातील हातगाडे व छोट्या व्यापाऱ्यांसाठी सोयीच्या जागेचे नियोजन करुन व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न करणार, शहरात सौर पथदिवे, शहरातील सर्व बोअर पुर्ववत चालू करणार, महिला, स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिक यांचा कर सवलत व वाढीव कर कमी करण्यासाठी प्रयत्न, शहरात अवश्यक ठिकाणी पार्किंग व्यवस्था, सार्वजनिक शौचालय उभारण, नगर परिषद आपल्या दारी विकासांचे तुम्हीच मानकरी या धरतीवर प्रत्येक प्रभागामध्ये आढावा बैठक घेऊन घरपोच रहिवाशी प्रमाणपत्र, जन्म प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र जे कांही लागणारे कागदपत्र घरपोच देण्याची सोय करणार, गेल्या २५ वर्षापासून रोजंदारी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना समाधानकारक वेतन देणार व कायम स्वरुपी नौकरी देऊन पुर्नवसन करणार. दर महीण्याला भर चौका चौकात अध्यक्ष, उपाध्यक्ष व नगरसेवकांच्या कार्याची आढावा बैठक घेणार. शहरातील दारिद्रय रेषेखालील लोकांना मोफत पिण्याचे पाणी देणार आदी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

शहर विकासासाठी येणारा निधी कोणीच रोखू शकणार नाही तसेच वाढीव निधी खेचून आणण्याची धमक आमच्यामध्ये असल्याचे यावेळी अभय साळुंके व हमीद शेख यांनी सांगत भ्रष्टाचारमुक्त नगरपालिका चालविण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्षसह सर्व नगरसेवकांना बहुमताने निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, पंकज शेळके, विलास लोभे, श्री कारखाने, धनाजी चांदुरे, अबरार देशमुख, झटींग म्हेत्रे, प्रशांत वांजरवाडे, सुनील नाईकवाडे सह सर्व उमेदवार पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाईः हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर छापेमारी ०४ गुन्हे दाखल- ९६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**लातूर/प्रतिनिधी :** हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर छापेमारी ०४ गुन्हे दाखल- ९६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केली असून या बाबत अधिक माहिती अशी, लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशानुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच मोहिमेअंतर्गत दिनांक २३/११/२०२५ रोजी पोलीस ठाणे रेणापूर हद्दीतील विविध ठिकाणी लपून-छपून हातभट्टी दारू तयार करणाऱ्या व्यक्तींवर धडक कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ४ व्यक्तींविरुद्ध ४ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, तयार दारू, हातभट्टी साहित्य व रसायन असा मिळून ९६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच घटनास्थळी आढळलेली हातभट्टी भट्टी, दारू आणि रसायनांचा जागेवरच नाश करण्यात आला. ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पथकातील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, मनोज खोसे आणि प्रवीण कोळसुरे यांनी केली. लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर पोलिसांकडून सातत्यपूर्ण आणि प्रभावी कारवाई सुरू आहे.अवैध हातभट्टीविरोधातील ही मोहीम यापुढेही अधिक तीव्र गतीने चालू राहणार आहे.

## लातूर शहर काँग्रेसला इच्छुकांची मोठी गर्दी
### प्रतिसाद पाहून उमेदवारी अर्जासाठी 30 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :** आगामी लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारी अर्ज स्वीकारण्याच्या प्रक्रियेत सहभागी होणेसाठी मोठा प्रतिसाद लाभला आहे. केवळ आठ दिवसांत तब्बल ४०० हून अधिक इच्छुकांनी उमेदवारी मागणी करीता पक्षाकडे अर्ज दाखल केले आहेत. कार्यकर्त्यांच्या मागणीचा विचार करून, पक्षाचे नेते माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मुदतवाढीला हिरवा कंदील दिला असून, आता इच्छुकांना ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत उमेदवारी मागणीचे अर्ज सादर करता येणार आहेत. विक्रमी ४०० हून अधिक अर्ज दाखल लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने प्रदेश काँग्रेसच्या सूचनेनुसार उमेदवारी अर्ज मागवण्याची मोहीम सुरू केली होती. शहर जिल्हाध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जवळपास ४०० इच्छुकांनी अर्ज सादर केले आहेत. ॲड. किरण जाधव यांनी सांगितले की, हा प्रतिसाद पक्षासाठी अत्यंत उत्साहवर्धक असून, केवळ सक्रिय कार्यकर्तेच नव्हे, तर विविध समाज घटकांचे, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि प्रमुख व्यक्तींनीही उमेदवारी मिळवण्यासाठी अर्ज दाखल केले आहेत. उमेदवारीसाठी असलेली ही उत्सुकता लातूरमध्ये काँग्रेसच्या वाढत्या ताकदीचे आणि जनमानसातील विश्वासाचे प्रतीक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने कार्यकर्त्यांच्या या मागणीसंदर्भात राज्याचे माजी मंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याशी चर्चा केली. आमदार अमित देशमुख यांनी कार्यकर्त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत मुदतवाढीला त्वरित मंजुरी दिली आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**देश प्रथम तत्वानुसार राष्ट्र निर्माण हे सर्व संस्थांचे पहिले ध्येय असावे - राष्ट्रपती**

## चिमटा दयाचा



**ढाब्यावर दारू पिणे हा नवीन प्रकार नाही! पकडल्यावर कारवाई होते, तरी पिणाऱ्यांची संख्या कमी नाही!!**

## फावडेवाडी-मुसळेवाडी-पानगाव-कारेपूर-सय्यदपूर- धवेली-आनंदवाडी रस्ता कामाला केंद्राची मान्यता
### आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नांना यश; नागरिकांतून मोठे समाधान



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर तालुक्यात असलेल्या फावडेवाडी-मुसळेवाडी -पानगाव -कारेपूर- सय्यदपूर- धवेली- कवठाळी- आनंदवाडी या २६ किलोमीटर रस्त्याच्या कामाला भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या वतीने केंद्रीय रस्ते निधी अंतर्गत तब्बल २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे सदरील रस्ता याचे काम मंजूर झाल्याने अनेक गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

रेणापूर तालुक्यात ऊस क्षेत्राचा (बागायती) भाग असलेल्या फावडेवाडी-मुसळेवाडी - पानगाव -कारेपूर- सय्यदपूर- धवेली - कवठाळी- आनंदवाडी या रस्त्यावरुन सातत्याने शेतीची माल वाहतूक मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे सदरील रस्ता अत्यंत खराब झाला आहे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी रस्त्याचे काम करावे अशी मागणी भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीनजी गडकरी साहेब यांच्याकडे केली होती त्याचबरोबर सर्व संबंधितांकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या मागणीचा प्राधान्याने विचार करून शेतकऱ्यासह नागरिकांना खराब रस्त्यामुळे वाहतुकीचा होत असलेल्या त्रास लक्षात घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीनजी गडकरी साहेब यांनी केंद्रीय मार्ग निधी (उठखक्र) योजने अंतर्गत सदरील रस्त्यांच्या २६ किलोमीटर कामास २५ कोटी रुपयाचा निधी २० नोव्हेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजुरी दिली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून खराब असलेल्या फावडेवाडी-मुसळेवाडी -पानगाव -कारेपूर- सय्यदपूर- धवेली- कवठाळी- आनंदवाडी या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाल्याने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे सदरील रस्त्यालगत असलेल्या विविध गावातील भाजपाच्या लोकप्रतिनिधी कार्यकर्त्यांसह नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्य् भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# भाजपाचे लक्ष तामिळनाडू व प.बंगाल

भारतीय जनता पार्टीला बिहारमध्ये भरघोष यश मिळाल्यानंतर आत्मविश्वासात वाढ होणे सहाजिकच आहे. देशात एकामागून एक प्रदेश भाजपामय करण्यात यश मिळत आहे. यासर्वामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अदृश्य ताकद आहे. जनतेला विश्वासदृढ देणारा नेता हवा होता. मजबुत व्यक्ती पंतप्रधान यांना समजल्याने बिहारमध्ये अभुतपुर्ण यश मिळविता आहे. दक्षिणेकडे यश मिळेल असे वाटत नव्हते. दक्षिणेत एक तर डावे नसता काँग्रेसशिवाय दुसरा पर्याय नव्हता. आता भाजपाच्या रुपात पर्याय जनतेला मिळाला आहे. जनता भाजपाला एवढ्या मोठ्या प्रमाणात स्विकारेल असे वाटत नव्हते. कारण जनतेला विश्वार्हक चेहरा आवश्यक होता. बिहारला मागासलेला प्रांत समजला जात होता तो चुकीचा ठरला आहे. बिहारचे अनेक वरिष्ठ पदावर अधिकारी आहेत. त्याच प्रमाणे देशात महत्वाच्या मोठ्या शहरात बिहारी माणसाला मागणी आहे. बिहारी माणूस हा मजबुत असा समजला जातो. प्रत्येक शहरात चांगली कामे करणारा व आवघड, मेहनती कामे करणारा बिहारी माणूस आहे. बहुसंख्येने मुंबईत अधिक संख्येने बिहारी माणूस कार्यरत आहे. उत्तरप्रदेशानंतर बिहारीसंख्या मोठ्या शहरात अधिक आहे. त्यामुळे बिहारमध्ये अनेक वर्ष लालूप्रसाद यादव यांच्याकडे सत्ता होती. त्यांनी प्रामाणिकपने मागासलेला हा कलंक धुऊन टाकण्यात असमर्थता दर्शविली. त्याचा परिणाम निवडणुक निकालावर दिसून आला. निवडणुकीत लालूचे चिरंजीवांना मोठा फटका बसला. गतवेळी सत्तेजवळ असणाऱ्या जागा यावेळी मिळतील व नितीशकुमार यांना डावलतील असे वाटत होते. नितीशकुमार यांना देखिल जनतेनी परत स्विकारले. भाजपाला मोठ्या प्रमाणात यश मिळेल असे वाटत नव्हते तरी त्यांनी आश्वासकपना दाखविला. महिलांची साथ मिळली. तसे आश्वासन तेजस्वी यादवांनी देखिल दिले होते. जनतेचा विश्वास बसण्यापुर्वी अनेक महिलांच्या खात्यावर रक्कम केली त्यामुळे मोठा विश्वास बसला. मुस्लीम महीलांनी देखिल भाजपाला यावेळी स्विकारल्याचे सांगण्यात येते. मध्यप्रदेश नंतर महाराष्ट्रात भाजपा यशस्वी झाले. आता बिहारात ते पुर्ण बहुमताने सत्तेत आला. त्यामुळे आता तामिळनाडू व प. बंगालमध्ये सत्ता मिळविण्याचा मोठा प्रयत्न होणार आहे. येथे डाव्यांची सत्ता आहे. काँग्रेसचे येथे काहीच वर्चस्व दिसून येत नाही. ममता बॅनर्जी यांना यावेळी धक्का देण्याचे काम भाजपाकडून होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एक तर तामिळनाडूमध्ये सर्वसाधरण समाज आहे. प बंगाल मध्ये घुसखोरी अधिक झाली आहे. ते स्थानिक असल्याचा दावा करीत आहेत. घुसखोरांना जर रोखले तर ममता बॅनर्जी यांना रोखले जाऊ शकते. बिहारमध्ये जसे काम भाजपाने केले. जी व्युहरचना केली ती यशस्वी होता येते, त्यामुळे भाजपाला अधिक कष्ठ घेऊन पश्चिमेकडे सत्ता मिळवायाची आहे. कर्नाटकात भाजपाने मोठा प्रयत्न केला तरी यश मिळू शकले नाही. यावेळी मात्र भाजपा वेगळीच व्युहरचना करून सत्ता ताब्यात घेण्याचा यशस्वी प्रयत्न करणार आहे. भाजपाला जी चाल खेळता आली व सत्तेसाठी खेळलेली चाल ही तामिळनाडू व प. बंगालमध्ये खेळण्याची शक्यता आहे. या दोन प्रांतात काँग्रेसचे काही चालणार नाही. या दोन प्रांतात प्रादेशिक पक्षाची चलती आहे. दक्षिणेत तसे पाहिले तर प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व कायम आहे. त्यामुळे काँग्रेसचा शिरकाव अशक्य आहे. येथे स्थानिक प्रादेशिक पक्ष व भाजपा अशी सरळ लढत होण्याची शक्यता आहे. भाजपाने आकरावर्षात ज्या प्रांतात भाजपाला यश मिळविता आले नाही त्याकडे विशेष लक्ष दिले. तसेच राजकारण खेळले गेले. उपराष्ट्रपती दक्षिणेकडील आहे. केंद्रात मंत्री काही मंत्री दक्षिणेकडील आहेत. त्यात कोणी गडबड केलीतर चौकशीचा ससेमिरा लागलेले असते! हे लक्षात घेता आता भाजपाला सहज पाच राज्यात एका नंतर एक यश मिळविले आहे. यात काँग्रेसला मोठा फटका सहन करावा लागला आहे. त्यामुळे स्थानिक प्रबल दावेदार असलेल्या पक्षत्तबरोबर भाजपा सोबत घेऊन निवडणुक लढविण्याची शक्यता आहे. भाजपाला या दोन प्रांतात यश मिळले तर आगामी काळात विरोधीपक्षम्हणून काँग्रेस राहाणार नाही. तसे पाहिले तर राहुल गांधी यांना यश मिळत नाही. बिहारमध्ये मोठी नामुषकी सहन करावी लागली आहे. एकतर दक्षिणेत हे स्थानिक प्रादेशिक पक्षाची चलती आहे. भाजपा किंवा काँग्रेसला दक्षिणेत युती-आघाडी करावीच लागेल मात्र दोघेजन स्वतंत्र लढले व जनता स्विकारेल असे होणार नाही. त्यामुळे काँग्रेस ममता बॅनर्जी सोबत आघाडी करू शकते. तामीळनाडूत तसे करू शकते. मात्र आघाडी होईल का नाही हा पुढचा प्रश्न निर्माण होतो. प. बंगालमध्ये भाजपला मोठा विरोध होत असला तरी भाजपा जनतेसोबत राहीला आहे. सुरक्षतेसाठी जनता भाजपाला स्विकारेल असे चित्र सध्याला दिसून येत आहे. भाजपासुद्धा विश्वासर्हता मोठ्या प्रमाणात निर्माण करीत आहे. तामिळनाडूत सत्ताधाऱ्याास कंठाळलेली जनता बदल म्हणून भाजपाला स्विकारू शकेल असे चित्र आहे. विकासाचा मुद्दा व त्या राज्यातील प्रश्नाची सोडवणुक भाजपा करीत आला आहे. जनमत मिळविण्याचा जो प्रयत्न केला जात आहे याला यश मिळू शकते. मोदी जे करतील तेच घडते असा विश्वास जनतेत निर्माण झाला आहे. यालाच काहीजन हुकूमशाह म्हणतात. आपल्यादेशात आज पर्यंत मोकळीकता काही प्रसंग होते ते व्यवस्थित हाताळले आहेत. स्वच्छंद राजकारणाबरोबर लोकशाही भोगली आहे. वास्तविक लोकशाहीत जनता लोकशाहीप्रमाणे वागते का? हा संशोधनाचा विषय होऊ शकतो. त्यामुळे जनतेला आता विश्वास भाजपाने दिला आहे. याला जनतेनी पाठींबा दर्शविला आहे. बिहारमध्ये भाजपाला अधिक जागा मिळविता आल्या, त्यानंतर नितीशकुमार यांना यश मिळविता आले. तरी नितीशकुमार यांनाच मुख्यमंत्रीपदी बसविले. ही एक भाजपाचा मोठापना नाही तर काँग्रेसला दाखविलेला आरसा आहे. यामुळे विश्वासात वाढ होते. दक्षिणेत विश्वास वाढावा व तामिळनाडू व प.बंगालमधील जनतेला पटावे असेच काम भाजपाकडून होताना दिसून येत आहे. त्यामुळे भाजपाचे यापुढील लक्ष्य हे प.बंगाल व तामीळनाडूत सत्ता मिळविणे हे एकमेव असणार आहे.

# नवीन कामगार कायदे: स्वरूप, लाभ आणि अंमलबजावणीची कसोटी




भारतातील कामगार कायद्यांच्या इतिहासात २१ नोव्हेंबर २५ हा दिवस कामगारांसाठी महत्त्वाचा ठरला आहे. या दिवशी केंद्र सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत चार कामगार संहिता तत्काळ प्रभावाने लागू केल्या. या चार संहितांनी मागील २९ जुन्या आणि अनेक दशकांपासून अस्तित्वात असलेल्या केंद्रीय कामगार कायद्यांची जागा घेतली आहे.

जुन्या कायद्यांची गुंतागुंत, त्यांची कालबाह्यता आणि आधुनिक अर्थव्यवस्थेशी जुळवून घेण्याची त्यांची अक्षमता ही २९ कायदे रद्द करण्यामागची मुख्य कारणे होती. आधुनिक अर्थव्यवस्थेला अनुरूप कायदेशीर चौकटआणि व्यवसाय सुलभीकरण तसेच जीवनमान सुलभीकरण ही उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा सरकारचा दावा आहे. नवीन कायद्यांमुळे एका बाजूला कामगारांना व्यापक सामाजिक सुरक्षा मिळण्याची अपेक्षा आहे, तर दुसऱ्या बाजूला उद्योगांना अनुपालनाचा भार कमी होऊन उत्पादनक्षमतेत वाढ होण्याची आशा आहे असे कायदा निर्माणकर्त्यांचे म्हणणे आहे.

**चार संहितांचा विस्तृत आशय**

नवीन कामगार कायदे प्रामुख्याने चार संहितांमध्ये समाविष्ट आहेत, ज्यांचा मूळ उद्देश

जुन्या कायद्यांचे सुसूत्रीकरण करणे आहे.

**१. वेज कोड २०१९**

- *किमान वेतनाची राष्ट्रीय अंमलबजावणी:* देशभरातील सर्व कामगारांना किमान वेतनाची कायदेशीर हमी मिळाली आहे. केंद्र सरकारने निश्चित केलेल्या ३९;राष्ट्रीय किमान वेतन३९; पेक्षा कोणताही पगार कमी असणार नाही.
- *नियुक्तीपत्र:* नोकरी सुरू करताना प्रत्येक कामगाराला नियुक्तीपत्र देणे अनिवार्य केले आहे, ज्यामुळे रोजगाराच्या अटींमध्ये पारदर्शकता येईल.
- *वेळेवर पगार:* नियोक्त्यांना कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर देणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.
- *ओव्हरटाईम:* ओव्हरटाईम साठी दुप्पट वेतन देण्याची तरतूद आहे.

**२. इंडस्ट्रियल रिलेशन्स कोड २०२०**

- *उद्योग वाद निवारण:* औद्योगिक वाद जलद गतीने आणि पारदर्शकपणे सोडवण्यासाठी यंत्रणा सुधारण्यात आली आहे.
- *दोन सदस्यीय औद्योगिक न्यायाधिकरण:* वाद निवारणासाठी दोन सदस्यीय औद्योगिक न्यायाधिकरण स्थापन केले जाईल, जिथे कर्मचारी थेट दाद मागू शकतील.
- *निरीक्षक-सह-सुलभकर्ता प्रणाली:* निरीक्षकांना दंडात्मक कारवाईऐवजी मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले आहे, ज्यामुळे गुन्हेगारीकरण कमी होईल.
- *निश्चित मुदतीच्या कर्मचाऱ्यांसाठी लाभ:* ठराविक कालावधीसाठी (निश्चित मुदत रोजगार) नेमलेल्या कर्मचाऱ्यांसाठी कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतन, रजा व वैद्यकीय सुविधा मिळणे बंधनकारक केले आहे.

**३. सोशल सिक्युरिटी कोड २०२०**

- *व्यापक सामाजिक सुरक्षा:* यात पीएफ (कर्मचारी भविष्य निर्वाह निधी), ईएसआयसी (कर्मचारी राज्य विमा महामंडळ), आरोग्य विमा, पेन्शन आणि ग्रॅच्युइटी यांसारख्या लाभांचा समावेश आहे.
- *गिग आणि प्लॅटफॉर्म वर्कर्स:* या कायद्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना (उदा. डिलिव्हरी बॉय, कॅब चालक) प्रथमच कायदेशीर सामाजिक सुरक्षा प्रदान केली आहे.
- *ग्रीगेटर्सची उत्तरदायित्वे:* ओला, उबर, झोमॅटो यांसारख्या ग्रीगेटर्स कंपन्यांना त्यांच्या वार्षिक उलाढालीच्या १% ते २% सामाजिक सुरक्षा निधीत योगदान देणे अनिवार्य केले आहे.
- *ग्रॅच्युइटी:* निश्चित मुदतीच्या कर्मचाऱ्यांसाठी ग्रॅच्युइटीचा कालावधी पाच वर्षांऐवजी फक्त एका वर्षावर आणला गेला आहे.



**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मो. ९८९०५७७१२८**

**४. एकसमान सुरक्षा मानके २०२०**

- *एकसमान सुरक्षा मानके:* सर्व उद्योगांसाठी एकसमान व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाच्या स्थितीचे मानके निश्चित केली आहेत.
- *आरोग्य तपासणी:* ४० वर्षांवरील सर्व कामगारांसाठी नियोक्त्याने वार्षिक आरोग्य तपासणी मोफत करणे बंधनकारक केले आहे.
- *महिला कामगार:* महिलांना रात्रीच्या शिफ्टमध्ये (रात्री ८ ते सकाळी ६) कामाची परवानगी देण्यात आली आहे, परंतु त्यासाठी आवश्यक सुरक्षा प्रोटोकॉल आणि त्यांची लेखी संमती घेणे अनिवार्य आहे.
- *धोकादायक उद्योगांना कठोर नियम:* खाणकाम आणि इतर धोकादायक उद्योगांसाठी कठोर सुरक्षा नियम लागू करण्यात आले आहेत. कोणाला काय लाभ? नवीन कामगार कायद्यांमुळे विविध घटकांवर परिणाम अपेक्षित आहे.
- *असंघटित क्षेत्र:* स्थलांतरित कामगार, कृषी, बांधकाम आणि सेवा क्षेत्रातील कोट्यवधी कामगार प्रथमच किमान वेतन आणि सामाजिक सुरक्षा कवचाखाली आले आहेत, ज्यामुळे त्यांच्या जीवनात स्थैर्य व सन्मान वाढेल.
- *गिग व प्लॅटफॉर्म वर्कर्स:* कॅब ड्रायव्हर्स, डिलिव्हरी बॉय, डबिंग कलाकार यांसारख्या सुमारे ७०-८० लाख गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि रोजगाराची औपचारिक ओळख मिळाली आहे.
- *महिला कामगार:* समान वेतनाची हमी, रात्रीच्या शिफ्टमध्ये कामाची संधी आणि तक्रार निवारण समित्यांमध्ये अनिवार्य प्रतिनिधित्व यामुळे महिलांचा श्रमसहभाग वाढण्यास मदत होईल.
- *उद्योगधंदे:* अनेक जुन्या कायद्यांच्या जागी सिंगल लायसन्स, सिंगल रिटर्न मॉडेल आल्याने अनुपालनाचा भार लक्षणीयरीत्या कमी होईल. निरीक्षक-राज संपुष्टात येऊन उद्योगांना उत्पादनक्षमतेत वाढ करण्याची संधी मिळेल.

**आर्थिक परिणाम**

कामगारांना वाढलेले किमान वेतन, ओव्हरटाईमचा दुप्पट पगार आणि सामाजिक सुरक्षा योगदानामुळे उद्योगांचा वेतन खर्च वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर याचा सुरुवातीला ताण येऊ शकतो. मात्र, अनुपालनातील सुलभता, औद्योगिक शांतता आणि कामगारांच्या वाढलेल्या उत्पादकतेमुळे दीर्घकाळात उत्पादकता खर्च कमी होईल आणि गुंतवणुकीला चालना मिळेल, ज्यामुळे रोजगार निर्मिती वाढेल.

**सामाजिक परिणाम**

४० कोटी कामगारांना सामाजिक सुरक्षा कवचाखाली आणणे, गिग कामगारांना प्रतिष्ठा देणे आणि आरोग्य तपासणी अनिवार्य करणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

यामुळे कामगारांना केवळ सुरक्षाच नव्हे, तर सन्मान आणि स्थैर्य देखील मिळेल, ज्यामुळे आरोग्यदायी कार्यस्थळांचे प्रमाण वाढेल.

**प्रशासकीय परिणाम**

सिंगल लायसन्स आणि सिंगल रिटर्न प्रणालीमुळे कामगार मंत्रालयाचे कामकाज सुलभ होईल. मात्र, राष्ट्रीय किमान वेतन लागू करणे, ग्रीगेटरचे योगदान वसूल करणे आणि राज्या-राज्यातील अंमलबजावणीतील असमानता दूर करणे हे प्रशासकीय पातळीवर मोठे आव्हान असेल.

औद्योगिक न्यायाधिकरणांवर सुरुवातीला कामाचा ताण वाढण्याची शक्यता आहे.

**कायदयासमोरील अडचणी**

नवीन कामगार कायदे हे अत्यंत प्रगतीशील असले तरी काही चिंता आहेत त्याचा विचार करणे गरजेचे आहे.

- किमान वेतनाची अंमलबजावणी: राष्ट्रीय किमान वेतन लागू करण्यातील तांत्रिक आणि आर्थिक आव्हाने मोठी आहेत, कारण प्रत्येक राज्याच्या राहणीमानाचा खर्च वेगवेगळा आहे.
- गिग कंपन्यांचा विरोध: सामाजिक सुरक्षेसाठी १-२% योगदान देण्याच्या तरतुदीला गिग कंपन्यांकडून तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे, कारण यामुळे त्यांचा परिचालन खर्च वाढेल.
- कामगार संघटनांची नाराजी: काही कामगार संघटनांनी औद्योगिक संबंध संहिता मधीलकामावरून काढणे आणिछटणी संबंधीच्या काही तरतुदींवर नाराजी व्यक्त केली आहे.

नवीन कामगार संहिताविकसित भारत २०४७ च्या दिशेने एक निर्णायक पाऊल आहे. असे मानले जात आहे. या कायद्यांचे उद्दिष्ट स्पष्ट आहे: कामगारांना सन्मान आणि सुरक्षा, उद्योगांना गती आणि सुलभता, आणि सरकारला पारदर्शकता. आंतरराष्ट्रीय स्तरावर चीन आणि सिंगापूरसारख्या देशांनी कामगार कायद्यांमध्ये केलेल्या सुधारणांच्या पार्श्वभूमीवर, भारताचे हे पाऊल जागतिक अर्थव्यवस्थेशी जुळवून घेणारे आहे. या कायद्यांमुळे देशातील ४० कोटींहून अधिक कामगारांचे जीवनमान सुधारण्याची मोठी क्षमता आहे. मात्र, केवळ कायद्यांची निर्मिती पुरेशी नाही. राज्या-राज्यात नियमांचे एकसमान आणि प्रभावी अंमलबजावणी करणे, हीच या सुधारणांची खरी कसोटी असेल. योग्य अंमलबजावणी झाल्यास, हे कामगार कायदे भारताला एक सुरक्षित, स्थिर आणि उत्पादक श्रमशक्ती प्रदान करतील, यामुळे जागतिकस्तरावर देशाची स्पर्धात्मकता वाढेल.



# रुद्राक्ष धारण करण्यापूर्वी जाणून घ्या हे खास नियम, जाणून घ्या रुद्राक्ष धारण करण्याची पद्धत आणि महत्त्व

आजच्या काळात, प्रत्येकाला जीवनातील सर्व प्रकारच्या संकटातून मुक्ती हवी असते. अशा स्थितीत जर तुम्ही रुद्राक्ष धारण करण्याचा विचार करत असाल, तर सर्वप्रथम तुम्हाला रुद्राक्ष धारण करण्याचे नियम जाणून घ्या, रुद्राक्ष धारण करण्यापूर्वी कोणते नियम पाळले, तर तुम्हाला शुभ फळ मिळतील. शास्त्रानुसार हिंदू धर्मात रुद्राक्षाचे खूप महत्त्व आहे. असे मानले जाते की भगवान शंकराला रुद्राक्ष अत्यंत प्रिय आहे. या कारणामुळे जो व्यक्ती रुद्राक्ष धारण करतो, त्याला देवाचा विशेष आशीर्वाद मिळतो.

धार्मिक मान्यतेनुसार, रुद्राक्षाची उत्पत्ती भगवान शंकराच्या अश्रूंपासून झाली आहे. या कारणास्तव हिंदू धर्मात रुद्राक्षाला चमत्कारिक आणि अलौकिक मानले जाते. रुद्राक्ष एका मुखीपासून ते एकवीस मुखीपर्यंत आढळतात. ज्यांचे स्वत:चे वेगळे महत्त्व आहे. नियमानुसार रुद्राक्ष धारण केल्यास सर्व प्रकारच्या संकटांपासून मुक्ती मिळते आणि कुंडलीतील ग्रहांची स्थितीही योग्य होते.

पौराणिक कथेत असा उल्लेख आहे की जेव्हा माता सतीने स्वत: अग्नीत प्रवेश करून आपल्या देहाचा त्याग केला, तेव्हा भगवान शंकराच्या डोळ्यातून अश्रू बाहेर पडले आणि ते अश्रू पृथ्वीवर अनेक ठिकाणी पडले आणि त्यातून निसर्गाला एक चमत्कारिक तत्व प्राप्त झाले. रुद्राक्षाचे रूप प्राप्त झाले. असे मानले जाते की जो व्यक्ती नियम आणि विधीनुसार रुद्राक्ष धारण करतो. त्याच्या जीवनातून दु:ख आणि वेदना हळूहळू दूर होऊ लागतात आणि भगवान शंकराचा आशीर्वाद राहतो.

रुद्राक्ष धारण करण्याचे नियम

ज्योतिषांच्या मते, जेव्हा कोणी रुद्राक्ष धारण करतो, तेव्हा त्याने प्रथम रुद्राक्ष मंत्र आणि रुद्राक्ष मूल मंत्राचा ९ वेळा जप करावा. याशिवाय हे लक्षात ठेवावे की रुद्राक्ष काढल्यानंतर तो पवित्र ठिकाणीच ठेवावा.

हिंदू धर्मात रुद्राक्ष हे तुळशीच्या जपमाळेसारखे पवित्र मानले जाते. त्यामुळे ते घातल्यानंतर मांस किंवा अल्कोहोलचे सेवन करू नका.

रुद्राक्ष कधीही स्मशानभूमीत नेऊ नये. याशिवाय नवजात बाळाच्या जन्माच्या वेळी किंवा ज्या ठिकाणी नवजात बाळाचा जन्म होतो, त्या ठिकाणी रुद्राक्ष धारण करणे टाळणे आवश्यक आहे.

आंघोळ केल्याशिवाय रुद्राक्षाला स्पर्श करू नये. आंघोळ करून शुद्ध झाल्यावरच रुद्राक्ष धारण करावा. यासोबतच 'ओम नम: शिवाय' या शिवमंत्राचा जप करत राहा.

लाल किंवा पिवळ्या धाग्यात रुद्राक्ष धारण करणे नेहमीच शुभ मानले जाते. काळ्या रंगाच्या धाग्यात कधीही घालू नका. याचा लोकांवर अशुभ परिणाम होतो.

रुद्राक्षाची जपमाळ धारण केल्यानंतर ती इतर कोणालाही अजिबात देऊ नका. यासोबतच दुसऱ्याने दिलेली रुद्राक्ष जपमाळ धारण करू नये.

रुद्राक्ष नेहमी स्वच्छ ठेवा. मण्यांच्या छिद्रांमध्ये धूळ आणि घाण साचू शकते. त्यांना शक्य तितक्या वेळा स्वच्छ करा. रुद्राक्षाचा धागा खराब झाला असेल किंवा खराब झाला असेल, तर तो बदलावा. साफ केल्यानंतर रुद्राक्ष गंगाजलाने धुवावे. त्यामुळे त्याची शुद्धता टिकून राहण्यास मदत होते.

रुद्राक्ष धारण करण्यापूर्वी त्याची शुद्धी आणि शुद्धीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. रुद्राक्ष सोमवार, महाशिवरात्री किंवा श्रावण महिन्यातील कोणत्याही दिवशी धारण करू शकतो. सर्वप्रथम चांदीच्या किंवा तांब्याच्या भांड्यात दूध, दही, मध, तूप आणि साखर घेऊन मिक्स करा. या मिश्रणात रुद्राक्षाला स्नान घालावा. आंघोळीनंतर पुन्हा शुद्ध पाणी आणि गंगाजलाने स्नान करून पूजास्थळी लाल कपड्यावर ठेवून गाईच्या तुपाचा दिवा लावून या मंत्राचा ५०१ किंवा ११०० वेळा जप करावा.

।। ॐ नम: शिवाय, या ॐ हूं नम: ।।

# मोबाईल स्क्रीनवर जाहिरातींचा महापूर, या छोट्या सेटिंगमुळे सोपे होईल काम

फोन वापरताना काही समस्या उद्भवतात, ज्यामुळे फोन वापरण्याचा अनुभव खराब होतो. या समस्यांमध्ये नेटवर्क समस्या आणि जाहिरातींचा वारंवार घटना समाविष्ट आहे. कामाच्या मध्येच जाहिरात आल्याने अनेक वेळा चिडचिड होते, अशा स्थितीत अनेकांना त्रास होऊन चिडचिड होते. पण तुमच्यासोबत असे होऊ नये म्हणून आम्ही तुम्हाला या समस्येपासून मुक्त कसे होऊ शकता ते सांगणार आहोत.

अशा प्रकारे जाहिराती होतील ब्लॉक

यासाठी सर्वात आधी तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा, त्यानंतर सर्च बारमध्ये 'Private DNS' लिहून सर्च करा.

यानंतर प्रायव्हेट डीएनएसवर क्लिक करा आणि प्रायव्हेट डीएनएस प्रोव्हायडर होस्टनेमच्या पर्यायावर क्लिक करा.

याच्या खाली तुम्हाला एक रिकामी जागा मिळेल ज्यामध्ये तुम्हाला ीळींरींशवपीरवर्सीरीव.ले़ लिहायचे आहे.

यानंतर ही कमांड सेव्ह करा. हे केल्यानंतर तुम्हाला जाहिराती दिसणे बंद होईल.

तुमच्या फोनमध्ये कमी थर्ड पार्टी ॲप्स वापरण्याचा कमी प्रयत्न करा. बऱ्याच वेळा, थर्ड-पार्टी ॲप्समुळे, अधिक जाहिराती येतात.

हा उपाय जाहिरातीपासून मुक्त होण्यास करेल मदत

जर वर नमूद केलेल्या पद्धतीमुळे जाहिरातींचा हल्ला थांबत नसेल, तर तुम्ही तुमच्या फोनमध्येही ही सेटिंग करू शकता. यासाठी सर्वप्रथम तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन गुगलवर क्लिक करा. यानंतर 'मॅनेज युअर गुगल अकाउंट' या ऑप्शनवर क्लिक करा.

येथे 'डेटा आणि गोपनीयता' या पर्यायावर क्लिक करा. यानंतर 'पर्सनलाइज्ड ॲप्स' वर जा. तुमच्या कोणत्या क्रियाकलापांचा मागोवा घेतला जात आहे, ते येथे तुम्ही पाहू शकता. ज्यामुळे तुम्हाला जाहिराती दाखवल्या जातात. गुगल तुम्हाला तुमच्या आवडीनुसार आणि शोधानुसार जाहिराती दाखवते.

'पर्सनलाइज्ड ॲप्स' नंतर 'माय सेंटर' या पर्यायावर क्लिक करा. येथे 'Personalized Ads' चा पर्याय दिसेल, तो बंद करा. हे केल्यानंतर, फोनच्या सेटिंग्जमध्ये पुन्हा जा आणि उददुत वर क्लिक करा आणि 'Advertising ID हटवा' वर क्लिक करून तो हटवा.

या सेटिंग्ज केल्यानंतर, तुम्हाला फोनवर जाहिराती दिसणे बंद होईल. तुम्ही आनंदाने आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय काहीही करण्यास सक्षम व्हाल.

सोलापूर - सोनार समाजातील उच्च शिक्षित परंपरागत व्यवसाय करणाऱ्या मुलांना मुली मिळेनात. अशी तक्रार कांही ठिकाणी केली जात आहे. हा खरोखरच एक गंभीर आणि जटील समश्या आहे. लग्नाच्या वयात पोहोचलेल्या तरुण तरुणीची संख्या वाढत असताना अशी परिस्तिथी निर्माण होणे योग्य नाही. सामाजिक मानसिकतेत बदल घडणे आवश्यक आहे. जेणेकरून मुलींच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल होईल. समाजातील उच्च शिक्षित मुली उच्च शिक्षित व्यावसायिक मुलाची आयुष्याचा जोडीदार म्हणून निवड करणाऱ्या उच्च शिक्षित मुलींची प्रेरणा आणि आदर्श घेऊन उच्च शिक्षित व्यावसायिक मुलाची निवड केलेल्या तरुणीना सोलापूर येथील सोनार समाज संस्थेकडून दरवर्षी गौरविण्यात येते. या वर्षी सोलापूर येथील इंजिनियर कु. श्रेया किशोर कुरुलकर यांनी पुणे येथील उच्च शिक्षित सराफ व्यावसायिक मुलाची आपल्या आयुष्याचा जोडीदार म्हणून निवड केली आहे. तसेच पुणे येथील पूर्वाश्रमीची इंजिनियर

# राज्यस्तरीय गौरव : कु. श्रेया कुरुलकर व सौं. अमृता वेदपाठक यांना हिरकणी पुरस्कार जाहीर

कु. अमृता उत्तरेश्वर पळसे यांनी माढा येथील इंजिनियर सराफ व्यावसायिक श्री प्रथमेश प्रमोद वेदपाठक या सराफ व्यवसायिकाची आयुष्याचा जोडीदार म्हणून निवड केली. आजच्या आधुनिक युगात जिथे करियर आणि वैवाहिक जीवन यांच्यात योग्य संतुलन साधणे एक आव्हान बनले आहे. तिथे आपल्या उच्च शिक्षणाचा उपयोग करून कु. श्रेया कुरुलकर व सौं अमृता वेदपाठक यांनी

आपला आयुष्याचा जोडीदार म्हणून एका उच्च शिक्षित व्यावसायिक मुलाची निवड केली हा केवळ एक वैयक्तिक निर्णय नसून तो समाजातील अनेक मुलींसाठी एक आदर्श आणि मार्गदर्शक ठरला आहे. कु. कुरुलकर व सौं वेदपाठक या दोघीनी आपल्या दूरदृष्टीने आणि व्यावहारिक दृष्टीकोनाने हे सिद्ध केले आहे की जेंव्हा दोन महत्वकांक्षी आणि सुशिक्षित व्यक्ती एकत्र येतात तेंव्हा ते केवळ स्वतःचेच नव्हे तर कुटुंबाचे, समाजाचे भविष्य उज्वल करू शकतात. त्यांचा निर्णय म्हणजे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे असेच म्हटले पाहिजे. हा त्यांचा निर्णय अत्यंत व्यावहारिक, दूरदृष्टीचा आणि पारंपारिक अपेक्षाना छेद देणारा आहे.यांनी हे सिद्ध केले आहे की, केवळ पदवी आणि नोकरीचा प्रकार महत्वाचा नसून दोन व्यक्तिमधील सामंजस्य एकमेकांच्या करिअर चा आदर आणि एकत्रितपणे भविष्य घडविण्याची क्षमता अधिक महत्वाची आहे.कु. श्रेया किशोर कुरुलकर आणि सौं. अमृता प्रथमेश वेदपाठक यांच्या धाडसी, स्वतंत्र आणि प्रेरणादायी निर्णयाबद्दल महिला सक्षमीकरणाचे प्रतीक असलेला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सोनार समाज संस्था, सोलापूर यांनी त्यांना जाहीर केला आहे. सदर पुरस्काराचे वितरण रविवार दि २८ डिसेंबर रोजी सोलापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सोनार समाज स्नेह मेळावा व राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ कार्यक्रमात मान्यवरांचे उपस्थित होणार आहे. सोनार समाजातील विविध स्तरातून दोघींचेही अभिनंदन होत आहे.


सौं. अमृता प्रथमेश वेदपाठक, माढा


कु. श्रेया किशोर कुरुलकर, सोलापूर

# विद्यार्थ्यांच्या संशोधन क्षमतेला चालना देणारे राज्यस्तरीय "DIPEX 2026"

## विद्यार्थ्यांनी १५ डिसेंबर २५ पर्यंत नोंदणी करावी




लातूर/प्रतिनिधी: विद्यार्थ्यांच्या संशोधन क्षमतेला दिशा देत ग्रामीण विकासासाठी सामाजिक नवोन्मेषाला चालना देण-ारा राज्यस्तरीय DIPEX 2026 - Social Innovation for Rural Development हा भव्य प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धा कार्यक्रम ५ ते ८ मार्च २०२६ दरम्यान एमआयटी कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन ट्रस्ट यांच्या वतीने तसेच एमआयटी सीएसएन यांच्या सहकार्याने हा चार दिवसांचा मेगा इव्हेंट आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र व गोवा राज्यातील डिप्लोमा, डिग्री, पीजी अभियांत्रिकी, कृषी तंत्रज्ञान व आयटीआय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ४०० हून अधिक कार्यरत मॉडेल्स या प्रदर्शनात पाहायला मिळणार आहेत. २००० पेक्षा जास्त विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होणार असून संशोधन व स्टार्टअप क्षेत्रातील दिग्गज तज्ज्ञ, उद्योगपती व गुंतवणूकदारही उपस्थित राहणार आहेत. निवडलेल्या प्रकल्पांना पुरस्कार व प्रोत्साहन निधी देण्यात येणार आहे.

### प्रमुख थीम विभाग


कृषी तंत्रज्ञान, संगणकीय बुद्धिमत्ता, संरक्षण आणि सायबर सुरक्षा, औद्योगिक ऑटोमेशन, ऊर्जा, गतिशीलता, वैद्यकीय व आरोग्य तंत्रज्ञान, सुरक्षा, शाश्वत नागरी पायाभूत सुविधा, ओपन इनोव्हेशन आणि कचरा व्यवस्थापन या क्षेत्रांत विद्यार्थी प्रकल्प सादर करणार आहेत.

### नोंदणी प्रक्रिया सुरू

विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू असून नोंदणीची शेवटची तारीख १५ डिसेंबर २०२५ अशी जाहीर करण्यात आली आहे. नोंदणी srijan.org.in या संकेतस्थळावर केली जाऊ शकते. प्रकल्प प्रस्ताव सादर केल्यानंतर विभागीय पातळीवरील प्रेझेंटेशन, मध्यवर्ती छाननी आणि त्यानंतर निवड प्रकल्पांची अंतिम यादी जाहीर केली जाणार आहे.

कार्यक्रमात इनक्युबेशन सपोर्ट, आयपीआर मार्गदर्शन, ब्रेनस्टॉर्मिंग सत्रे, पॅनेल चर्चा आणि गुंतवणूक संधी यांचाही समावेश आहे. ग्रामीण समस्यांचे तांत्रिक सोडवणुकीकडे युवांना प्रेरित करण्याचे हे व्यासपीठ ठरणार आहे, असा आयोजकांचा विश्वास आहे.

# तणाव आणि चिंता दूर करण्यासाठी ध्यानसाधना उपयोगी



करा,मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी प्रभावी आधुनिक जीवनशैलीमुळे तणाव आणि चिंता या समस्या सामान्य होत आहेत. रोजच्या जीवनातील दगदगी, जबाबदाऱ्या, आर्थिक अडचणी आणि स्पर्धात्मक वा-तावरण यामुळे मनावर दडपण येते. अशा परिस्थितीत ध्यान, किंवा मेडिटेशन, हा एक प्रभावी उपाय ठरतो. प्राचीन काळापासून ध्यानाला मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारण्यासाठी उपयुक्त मानले जाते. दररोज ध्यान केल्यास तणाव, चिंता, आणि इतर मानसिक विकारांवर नियंत्रण मिळवता येते.

**ध्यान म्हणजे काय?**

ध्यान म्हणजे स्वतःला एका ठिकाणी केंद्रित करून आपल्या विचारांवर आणि भावनांवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया. ध्यानाचा उद्देश मन शांत ठेवणे, नकारात्मक विचारांपासून मुक्त होणे आणि सकारात्मक ऊर्जेची निर्मिती करणे हा असतो. यासाठी विशिष्ट पद्धतीने श्वास घेणे, एखाद्या मंत्राचा जप करणे, किंवा एका जागी बसून मन स्थिर ठेवणे यासारख्या तंत्रांचा वापर होतो.

**ध्यानाचे मानसिक फायदे**

**१. तणाव कमी करणे:** ध्यानामुळे शरीरातील कोर्टिसोल या तणावाशी संबंधित हार्मोनची पातळी कमी होते. यामुळे मन शांत राहते आणि मानसिक शांतीचा अनुभव येतो.

**२. चिंता दूर करणे:** दररोज ध्यान केल्याने सतत चिंता वाटण्याची सवय कमी होते. हे मनाला स्थिर ठेवण्यास मदत करते.

**३. स्मरणशक्ती सुधारते:** ध्यान केल्याने मेंदूच्या काम करण्याच्या क्षमतेत सुधारणा होते, ज्यामुळे स्मरणशक्ती व निर्णयक्षमता वाढते.

**४. डिप्रेशनवर उपाय:** ध्यानामुळे नकारात्मक भावना कमी होऊन डिप्रेशनसारख्या गंभीर मानसिक समस्यांवर सकारात्मक परिणाम होतो.

**ध्यानाचे शारीरिक फायदे**

**१. रक्तदाब नियंत्रित करणे:** ध्यान नियमितपणे केल्याने रक्तदाब संतुलित राहतो, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.

**२. झोपेची गुणवत्ता सुधारते:** ध्यानामुळे मन शांत होते, ज्यामुळे झोपेची गुणवत्ता वाढते आणि निद्रानाशाचा त्रास कमी होतो.

**३. इम्यून सिस्टम मजबूत करणे:** ध्यान केल्याने शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**४. शरीरातील ऊर्जा वाढते:** ध्यानामुळे शरीर आणि मन या दोन्हींच्या उर्जेची पातळी वाढते, ज्यामुळे दिवसभर ताजेतवाने वाटते.

**ध्यान कसे करावे?**

**१. योग्य जागेची निवड:** ध्यान करण्यासाठी शांत आणि निवांत जागा निवडावी.

**२. सरळ बसण्याची स्थिती:** जमिनीवर पाठीचा कणा सरळ ठेवून बसावे.

**३. श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रित करणे:** डोळे बंद करून श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रीत करा.

**४. दररोज वेळ द्या:** ध्यानासाठी दररोज १५-२० मिनिटे वेळ काढा.

**हेही वाचा :तणाव दूर करण्यासाठी काय करावे?**

ध्यानाची सवय लावा

ध्यानाचा फायदा होण्यासाठी नियमितता आवश्यक आहे. सुरुवातीला काही मिनिटांसाठी ध्यान करा आणि नंतर हळूहळू कालावधी वाढवा. ध्यानाचे तंत्र शिकण्यासाठी अनुभवी मार्गदर्शकाची मदत घ्या.

हेही वाचा : नवीन वर्षाची सुरुवात करा चांगल्या मानसिक आरोग्याने; फॉलो करा 'या' ७ टिप्स

तणाव आणि चिंता यांसारख्या समस्यांवर ध्यान हा अत्यंत प्रभावी उपाय आहे. हे मानसिक शांती देण्यासोबतच शारीरिक आरोग्यही सुधारते. रोजच्या धकाधकीच्या जीवनात थोडा वेळ काढून ध्यान करण्याची सवय लावल्यास जीवन अधिक आनंदी आणि सकारात्मक होऊ शकते. ध्यान ही मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी आजच्या काळातील आवश्यक गरज बनली आहे.

## पिंडखजूर : या मोसमात अवश्य सेवन करावे हे करून बघा..।

### डॉक्टर टीप्स



पिंडखजूर थंडीत संपूर्ण भारतात आरामात उपलब्ध राहतात. याचे वृक्ष ३० ते ४० फूट लांब, ३ फूट चौरस हलक्या भुरा रंग व पान १० ते १५ फूट लांबीचे असतात. हे एक ते दीड इंच लांब, अंडकार व गडद लाल रंगाचा फळ असतो. पिंडखजूरच्या आतील बिया फारच कडक असतात.

लीव्हर : यकृताच्या कार्यासाठी आवश्यक पाचक रसाला वाढवण्यात मदत करतो.

बुद्धकोष्ठता : फायबरची अधिकतेमुळे बुद्धकोष्ठता दूर करतो.

वजन वाढवतो : कार्बोहायड्रेड व कॅलोरीची मात्रा जास्त असल्यामुळे वजन वाढण्यात मदत मिळते.

तंत्रिका तंत्र : साखरेची मात्रा जास्त असल्यामुळे मेंदू क्रियाच्या क्षमता वाढवण्यात सहायक असते.

मिनरल : आयरन व कॅल्शियमची अधिक मात्रा असल्याने शरीरात रक्त वाढवण्यात व हाडांना मजबूत करण्यात सहायक असतो.

थकवा व चक्कर दूर करतो. तसेच संक्रामक रोग, जसे सर्दी व तापापासून बचाव करतो.

## विनोद




भारत व पाकच्या सरहद्दीवर राहणाऱ्या हरबनसिंगाने आपला छोटा मुलगा दूर पुण्याला त्याच्या काकाकडे पाठवून दिला. सरहद्दीवर युद्ध पेटलेच तर आपल्या मुलाला त्याची झळ नको असा विचार त्याने केला. काही दिवसांनी हरबनसिंगला तार आली. मुलगा परत पाठवत आहे, त्याच्याऐवजी युद्ध पाठवा.

## संदेश

Zindgi hasin hai zindgi se
pyar karo,
hai raat to subah ka intzar
karo,
wo pal bhi ayega jiska intzar
hai apko,
rab pe bharosa aur waqt pe
aitwar karo...

स हा

## सुविचार

आई म्हणजे मुलांची पहिला शाळा असते.

**- अज्ञात**




### संस्कृत सुभाषित

**अर्थागमो नित्यमरोगिता च प्रिया च भार्या प्रियवादिनी च । वश्यश्च पुत्र-ोऽर्थकरी च विद्या षड् जीवलोकस्य सुखानि राजन् ।।**

**अर्थ** -हे राजा, नित्य होत असलेली अर्थप्राप्ती, शरीरस्वास्थ्य, मधुर बोलण-ारी प्रिय पत्नी, आवडती स्त्री, अर्थ प्राप्त करून देणारी विद्या, आज्ञा पाळणारा पुत्र या गोष्टी म्हणजे जीवलोकातील सुखे आहेत.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. लव्ह मॅरेजला मराठी शब्द
५. हिंमत, धैर्य
९. लाकडी चपला
११. सोसायट्याच्या वाऱ्यासह पाऊस
१२. स्थान, जागा
१३. दुबळा, लेचापेचा
१४. लग्नात यावरून रुसवेफुगवे ठरलेले!
१६. एकशे ऐंशी अंशाचा कोन
१८. महिरप
२०. कोरडे काजळ
२२. दरवळ
२३. दरोडा
२४. नावाडी, धनुष्य
२६. पर्जन्यकाळ
२८. विविध, अनेक
३१. वेगात, जोरात
३२. खानेसुमारी
३५. करूणा, कीव
३६. चालू समय
३७. मदनाचे एक नाव
३८. मित्र, सोबती
३९. चांदणी
४०. उणीव भरून काढणारी
४२. दगडापेक्षा मऊ
४४. गाजावाजा, आरडाओरडा
४६. दुलई
४८. दागिने घडवणारा
५१. युद्ध (हिंदी)
५२. युद्धनौका (इंग्रजी)
५४. ओझी वाहणारा
५६. भूतकाळ
५८. जवळ (हिंदी)
६०. एक तंतूमय वनस्पती
६१. मराठीत कोर्ट
६३. मंदिर
६४. नूतन
६७. चहा पिण्याचे साधन
६८. एकरूप
६९. टाळ्यांचा प्रचंड आवाज
७०. शर्करा

### उभे शब्द

१. प्रेमयुक्त, स्नेहल
२. लग्नसोहळा
३. भांडण
४. पश्चातबुद्धी होऊन दुःखी होणे
५. अवहेलना
६. चेहरा, मुख
७. नमस्कार
८. वैर, संबंधातील वाकडेपणा
९. एकूण एक, सविस्तार
१०. बडबड्या
१५. पानाची शेती
१७. संतोषजनक
१९. वर्तमानपत्रातील कप्पा
२१. पृथ्वी
२२. गळा
२५. गरजू, नडलेला
२६. ब्रेड
२७. मोठा हातोडा
२९. निराश
३०. जेवण
३२. प्रजा, रयत
३३. पाझरणारा
३४. 'गुरुग्रंथ साहेब'मध्ये अभंग समाविष्ट अस-लेले मराठी संत
४१. परागकण
४२. जहर
४३. मजबूत, कडक
४४. आकाश
४५. हिस्सा
४७. परमेश्वर
४९. सीता
५०. सट्टेबाजीमुळे भावात सोन्याशी स्पर्धा करू लागलेला धातू
५१. रान, वन
५३. डाक
५४. वाटा
५५. फुशारकी सांगणारा, बडबड्या
५६. दया-क्षमा (करणे)
५७. इतिहास
५९. आठवण
६०. दिवसाचा चोवीसावा भाग
६२. भानगड, मागे लागलेले शुक्लकाष्ठ
६३. देशात तयार झालेले
६४. वाकण्याची क्रिया
६६. नाडी
६७. डोंगराचा उभा भाग

### आडवे उत्तर

१.प्रेमविवाह ५.अवसान ९.खडावा
११.वादळ १२.पद १३.मरतुकडा
१४.मानपान १६.सरळकोन १८.मखर
२०.सुरमा २२.घमघमाट २३.डाका
२४.सारंग २६.पावसाळा २८.नाना
३१.भरधाव ३२.जनगणना ३५.दया
३६.वर्तमानकाळ ३७.मनोज
३८.सवंगडी ३९.तारका ४०.भर
४२.विट ४४.गवगवा ४६.रजई
४८.आभूषणकार ५१.जंग ५२.गनबोट
५४.भारवाहक ५६.गतकाल
५८.पास ६०.ताग ६१.न्यायालय
६३.देवालय ६४.नवीन ६७.कपबशी
६८.समरस ६९.कडकडाट ७०.साखर

### उभे उत्तर

१.प्रेमळ २.विवाहसमारंभ ३.वाद
४.हळहळणे ५.अपमान ६.वदन
७.नमन ८.वितुष्ट ९.खडानखडा
१०.वाचाळ १५.पानमळा
१७.समाधानकारक १९.रकाना
२१.रसा २२.घसा २५.गरजवंत
२६.पाव २७.घण २९.नाराज
३०.उदरभरण ३२.जनता ३३.गळका
३४.नामदेव ४१.रज ४२.विष
४३.टणक ४४.गगन ४५.वाटा
४७.ईश्वर ४९.भूमीकन्या ५०.रजत
५१.जंगल ५३.टपाल ५४.भाग
५५.वाचावीर ५६.गय ५७.कालपट
५९.सय ६०.तास ६२.लचांड ६३.देशी
६४.नम ६६.नस ६७.कडा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारतीय संघाची वनडे मालिकेसाठी घोषणा

**गिलच्या अनुपस्थितीत हा खेळाडू करणार नेतृत्त्व**

दिल्ली-भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरूद्ध कसोटी मालिकेनंतर वनडे मालिका खेळवली जाणार आहे. ३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. भारताचा नवा वनडे कर्णधार शुबमन गिल दुखापतीमुळे या मालिकेतून बाहेर झाला आहे. त्यामुळे गिलच्या अनुपस्थितीत बीसीसीआयने नव्या खेळाडूवर नेतृत्त्वाची जबाबदारी दिली आहे. तर रोहित शर्मा व विराट कोहलीदेखील या संघात असतील.

गुवाहाटीमध्ये झालेल्या दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी निवड समितीची बैठक झाली आणि त्यानंतर संघाची घोषणा करण्यात आली आहे.

### मार्को यान्सन बनला षटकारांचा नवा बादशाह!



दिल्ली-भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील दुसरा सामना गुवाहाटीच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेने ४८९ धावांचा डोंगर उभारला. दक्षिण आफ्रिकेकडून फलंदाजी करताना मुथूसॅमीने दमदार शतक झळकावलं. तर शेवटी मार्को यान्सनने षटकारांचा पाऊस पाडून ९३ धावांची वादळी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने मोठा विक्रम मोडून काढला आहे.

### हेडची स्टंटबाजीमुळे ऑस्ट्रेलिया २ दिवसांमध्येच झाला कंगाल!

पर्थ-ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यातल्या ॲशेस सीरिजचा रोमांच सुरू झाला आहे. सीरिजचा पहिला सामना पर्थमध्ये झाला, जो दोनच दिवसांमध्ये संपला. या सामन्यासाठी रेकॉर्ड ब्रेक प्रेक्षक स्टेडियममध्ये पोहोचले. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाची खतरनाक बॉलिंग आणि चौथ्या इनिंगमध्ये ट्रॅविस हेडचे वादळी शतक, यामुळे दुसऱ्याच दिवशी या मॅचचा निकाल लागला.ऑस्ट्रेलियाने ॲशेस सीरिजची पहिली मॅच ८ विकेटने जिंकली. चौथ्या इनिंगमध्ये ट्रॅविस हेडने ८३ बॉलमध्ये १२३ रनची खेळी केली, ज्यात १६ फोर आणि ४ सिक्सचा समावेश होता. पण ट्रॅविस हेडच्या या खेळीमुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाचं तब्बल १७.३५ कोटी रुपयांचं नुकसान झालं आहे. दोनच दिवसांमध्ये मॅच संपल्यामुळे क्रिकेट ऑस्ट्रेलियाला याचा मोठा फटका बसला आहे.

### स्मृतीच्या वडिलांना सौम्य अटॅक, बीपी वाढला पण...

मुंबई-भारतीय क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधनाच्या वडिलांची तब्येत सध्या स्थिर असल्याची माहिती समोर आली आहे. स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांचा बीपी वाढला होता आणि सौम्य हृदयविकाराचा झटका आल्याचे दिसून आले. त्यामुळे स्मृती आणि पलाश मुच्छलचे आज होणारे लग्नही पुढे ढकलण्यात आले. स्मृतीच्या वडिलांवर सांगलीतील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून एक ते दोन दिवस त्यांना देखरेखीखाली ठेवण्यात येणार आहे.स्मृती मानधना आणि पलाश मुच्छलचा रविवारी सांगलीत शाही विव-ाहसोहळा पार पडणार होता. मात्र विवाहाआधी स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांची तब्येत बिघडली.

### विश्रांती हवी असल्यास आयपीएल सोडा: गौतम गंभीर

गुवाहटी : भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात सध्या दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवण्यात येत आहे. या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात दक्षिण अफ्रिकेने भारताचा पराभव करत १-० अशी आघाडी घेतली. २२ नोव्हेंबरपासून भारत आणि दक्षिण अफ्रिकेत दुसरा कसोटी सामना रंगणार आहे. याआधी एक महत्वाची घडामोड घडली. भारताचा कर्णधार शुभमन गिल दुसर्या कसोटीतून बाहेर पडला आहे. आता दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या दुसर्या कसोटी सामन्यात शुभमन गिलऐवजी ऋषभ पंत टीम इंडियाचं नेतृत्व करणार आहे.

## ट्रॅव्हिस हेडच्या तुफानी शतकामुळे ऑस्ट्रेलियाचा विजय



पर्थ : ॲशेस मालिकेतील पहिलीच कसोटीत पहिल्या सत्रापासून सुरू झालेला बळी टिपण्याची कामगिरीमुळे अवघ्या दीड दिवसात सामन्याचा शेवट झाला. पर्थच्या ऑप्टस स्टेडियमवरील धोकादायक खेळपट्टीने इंग्लंडला अक्षरशः गुडघ्यावर आणलं आणि ऑस्ट्रेलियाने ८ बळीने धडाकेबाज विजय मिळवून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

सामन्याच्या पहिल्या दिवशी दोन्ही संघांच्या एकूण १९ बळी पडल्या आणि दुसर्या दिवशीही हा कहर थांबला नाही. अर्ध्या दिवसाच्या खेळातच ११ बळी पडल्या.

इंग्लंडचा दुसरा डाव केवळ १६४ धावांवर सर्वबाद झाला. त्यामुळे ऑस्ट्रेलियासमोर २०५ धावांचे लक्ष्य झाले. या खेळपट्टीच्या परिस्थिती पाहता अजिबात सोपे नव्हते, पण ट्रॅव्हिस हेडने फक्त ६९ चेंडूत तुफानी शतक ठोकून सामना ऑस्ट्रेलियाच्या खिशात टाकला.

इंग्लंडने दिलेले २०५ धावांचे लक्ष्य पहिल्या तीन डावांच्या परिस्थितीनुसार भल्यामोठे वाटणारे होते. पिचवर वेगवान गोलंदाजांचे वर्चस्व आणि सतत पडणार्या बळी पाहता इंग्लंडचा विजय निश्चित मानला जात होता. पण ट्रेविस हेडने इंग्लिश गोलंदाजांना अक्षरशः धू-धू धुतले. ट्रेविस हेडने एकहाती सामना ऑस्ट्रेलियाच्या बाजूने खेचत ८३ चेंडूत १२३ धावांची ऐतिहासिक वादळी खेळी साकारली. यामध्ये १६ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. विशेष म्हणजे, हेडने केवळ ६९ चेंडूत शतक ठोकत क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाकडून चौथे वेगवान शतक ठोकले. मार्नस लाबुशेनने ५१ धावांची अर्धशतकी खेळी करून हेडला उत्तम साथ दिली.

इंग्लंडने पहिल्या डावात १७२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तर ऑस्ट्रेलियाला फक्त १३२ धावांवर गारद करत इंग्लंडने ४० धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. त्यानंतर दुसर्या डावात इंग्लंडने ही आघाडी वाढवत ऑस्ट्रेलियासमोर २०५ धावांचे आव्हान ठेवले. पिच पाहता हे लक्ष्य कठीण नाही तर अतिशय कठीण वाटत होते. पण चौथ्या डावात ऑस्ट्रेलियाने आक्रमक क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला आणि तो १०० टक्के यशस्वी ठरला. गोलंदाजीत मिचेल स्टार्कने कहर करत या सामन्यात तब्बल १० विकेट्स घेतल्या. पहिल्या डावात ७ आणि दुसर्या डावात ३ असे स्टार्कचे आकडे राहिले. इंग्लंडकडून बेन स्टोक्सने पहिल्या डावात ५ विकेट्स घेतल्या, पण त्याची मेहनत इंग्लंडला विजय मिळवून देऊ शकली नाही. ऑस्ट्रेलियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

संक्षिप्त धावफलक

ऑस्ट्रेलिया (पहिला डाव) : ४५.२ षटकांत १३२/१०

ऑस्ट्रेलिया (दुसरा डाव): हेड १२३, लबुशेन ५१, जॅक २३, स्मिथ २, २८.२ षटकांत २०५/२

इंग्लंड(दुसरा डाव): ३४.४ षटकांत १६४/१०

इंग्लंड(पहिला डाव) : ४५.२ षटकांत १३२/१०

## तंदुरुस्ती-सामुदायिक भावनेच्या जल्लोषासाठी धावणार पुणेकर

पुणे : फेडरल बँकतर्फे आयोजित करण्यात आलेली पुणे मॅरेथॉन २०२५ रविवारी होणार आहे. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात तंदुरुस्तीचा कस पाहणारी, तसेच मनोधैर्याची चाचणी घेणारी आणि सामुदायिक भावनेचा जल्लोष करणार्या या क्रीडा सोहळ्यात तीन हजारांहून अधिक धावपटू यंदा सहभागी होणार आहेत. पुणे प्रांतात सर्वाधिक आतुरतेने वाट पाहिल्या जाणार्या फिटनेस स्पर्धांपैकी एक असलेली ही मॅरेथॉन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मैदानापासून सुरु होणार असून समारोप पुन्हा ते-थेच होणार आहे. मॅरेथॉन स्पर्धेचा तपशील: मॅरेथॉनमध्ये विविध गटातील धावपटूंसाठी चार अंतराच्या शर्यती असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे: ४२ किमी पूर्ण मॅरेथॉन: उपस्थितीची वेळ: पहाटे ४:०० वाजता। धावपटूंना हिरवा झेंडा: पहाटे ४:३०

२१ किमी अर्ध मॅरेथॉन : उपस्थितीची वेळ: पहाटे ५:०० । धावपटूंना हिरवा झेंडा: पहाटे ५:३० १० किमी धावणे: उपस्थितीची वेळ: पहाटे ५:३० । धावपटूंना हिरवा झेंडा: सकाळी ६:०० ५ किमी फन रन: उपस्थितीची वेळ: सकाळी ६:०० । धावपटूंना हिरवा झेंडा: सकाळी ६:३० प्रारंभ आणि समाप्तीचे ठिकाण: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मैदान मार्ग आणि सुविधा सहभागी धावपटूंना पाषाण, बावधन, बाणेर फाटा, सीआयडी ऑफिस, इराणी कॅफे सर्कल आणि पुणे विद्यापीठ कॅम्पस परिसरातील निसर्गरम्य मार्गांचा अनुभव घेता येईल. पिण्याचे पाणी आणि न्यूट्रीशन: मॅरेथॉन मार्गावर ८ पिण्याचे पाणी पुरविणारे पॉइंट्स आणि एका ठिकाणी न्यूट्रीशन सुविधा. वैद्यकीय मदत: ८ रुग्णवाहिका, ३० फिजिओथेरपिस्ट, रेलिस स्प्रे, आईस पॅक आणि एक विशेष वैद्यकीय उपच-ार झोन. सायकलस्वार आणि दुचाकीस्वार धावपटूंना मार्गावर आपातकालीन प्रसंगी मदत करतील. स्वच्छता: मॅरेथॉन मार्गालगत फिरती शौचालये आणि कार्यक्रमाच्या मुख्य स्थळी व्हीआयपी शौचालयांची सुविधा राहणार. उदघाटनस्थळी



## टी-२० विश्वचषकामध्ये भारत-पाकिस्तान एकाच गटात सामील

मुंबई : टी-२० विश्वचषक २०२६ साठीच्या ग्रुपची रूपरेषा जवळपास अंतिम झाली आहे. एकूण २० संघ या स्पर्धेत सहभागी होणार असून प्रत्येक ग्रुपमध्ये ५ संघ अशा चार ग्रुपमध्ये विभागणी करण्यात येणार आहे. आयसीसीकडून यावर अधिकृत शिक्का बसणे बाकी असले तरी ग्रुप निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे.

यजमान भारताला तुलनेने सोपा ग्रुप मिळाल्याचे दिसत आहे, तर सह-यजमान श्रीलंका थोड्या कठीण ग्रुपमध्ये जाण्याची शक्यता आहे.

यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भारत आणि पाकिस्तान एकाच ग्रुपमध्ये आहेत. त्यामुळे भारत-पाकिस्तान सामना किमान एकदा तरी होणार हे निश्चित आहे.टी२० वर्ल्ड कप २०२६ चे आयोजन भारत आणि श्रीलंका मिळून करणार आहेत.स्पर्धेची सुरुवात ७ फेब्रुवारीला होणार असून ८ मार्चला अंतिम सामना खेळला जाईल. भारताचा पहिला सामना गतविजेते म्हणून ८ फेब्रुवारी रोजी यूएसएविरुद्ध



नरेंद्र मोदी स्टेडियम अहमदाबाद येथे होण्याची शक्यता आहे. क्रिकबझच्या मते, यावर्षी टी-२० वर्ल्ड कपमध्ये २० संघ सहभागी होतील. यावेळी, भारताच्या गटात पाकिस्तान, अमेरिका, नामिबिया आणि नेदरलँड्सचा समावेश आहे.शिवाय, भारताचा पाकिस्तानविरुद्धचा सामना १५ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये खेळला जाण्याची अपेक्षा आहे. २०२६ च्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये भारताचा पहिला सामना अमेरिकेविरुद्ध असेल, जो ८ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये खेळला जाऊ शकतो, तर भारतीय संघ १२ फेब्रुवारी रोजी दिल्लीमध्ये नामिबियाविरुद्ध खेळेल. १५ फेब्रुवारी रोजी भारताचा कोलंबोमध्ये पाकिस्तानशी सामना होईल, तर १८ फेब्रुवारी रोजी टीम इंडियाचा मुंबईत नेदरलँड्सशी सामना होईल. भारतातील मुंबई, कोलकाता, चेन्नई, दिल्ली आणि अहमदाबाद येथे सामने होतील, तर श्रीलंकेतील कोलंबो आणि कँडी येथे टी-२० वर्ल्ड कप सामने होतील. जर पाकिस्तान संघ अंतिम फेरीत पोहोचला नाही, तर अहमदाबादचे नरेंद्र मोदी स्टेडियम अंतिम सामन्याची मेजबानी करेल. कोलंबोला एका सेमीफायनलसाठी शॉर्टलिस्ट करण्यात आले आहे, पण त्यासाठी पाकिस्तान किंवा श्रीलंका यांपैकी एखाद्या संघाने किमान उपांत्य फेरी गाठणे आवश्यक आहे.

## लग्नमंडपात स्मृतीचे वाजत गाजत स्वागत आणि वडिलांना हार्टअटॅक, लग्नसोहळा पुढे ढकलला

दिल्ली-टीम इंडियाची स्टार फलंदाज आणि वर्ल्ड कप विजेती स्मृती मानधना आणि संगीत दिग्दर्शक पलाश मुच्छल यांचा आज लग्नसोहळा पार पडणार होता. पण आज अचानक स्मृती मानधनाचा हीचा लग्नसोहळा पुढे ढकलल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे नेमके असे काय झाले आहे? जेणेकरून हा लग्नसोहळा पुढे ढकलण्यात आला आहे? हे जाणून घेऊयात.गेल्या साधारण शुक्रवार शनिवार पासून स्मृती मानधनाच्या लग्नाची धुम सांगलीत सूरू होती. या संदर्भातील हळदीचे फोटो देखील समोर आले होते. त्यानंतर आज स्मृती मानधना आणि पलाश मुच्छल यांचा लग्न सोहळा पार पडणार होता. पण अचानक स्मृची मानधानाचा लग्नसोहळा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खरं तर स्मृती मानधनाच्या वडिलांना लग्नाच्या तयारी दरम्यान हृदयविकाराचा झटका आला होता,



ज्यामुळे त्यांची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे भरलग्नमंडपात ॲम्ब्युलन्स बोलावून त्यांना सर्वहित रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. पण वडिलांची तब्येत जिथपर्यत पुर्णपणे बरी होत नाही तिथपर्यंत लग्नसोहळा पुढे ढकलण्यात आला आहे.

बाबा जोपर्यंत बरे होत नाही तोपर्यंत लग्न करणार नाही- स्मृती मानधना

आज नाश्ता करतानाच त्यांना अस्वस्थ वाटू लागले. पण त्यांना बरं वाटत नसल्याने आम्ही रुग्णवाहिका बोलावली. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. श्रीनिवास मानधना हे डॉक्टरांच्या निगराणीखाली आहेत. स्मृती आणि तिच्या वडिलांचे नाते खूपच भावनिक असून ते जोपर्यंत बरे होत नाहीत तोपर्यंत अनिश्चित काळासाठी लग्नसोहळा पुढे ढकलण्याचा निर्णय स्वत: स्मृतीने घेतला असल्याचे तिच्या कुटुंबियांनी माध्यमांना सांगितले आहे.स्मृतीच्या वडिलांची तब्येत कशी आहे?स्मृतीच्या वडिलांच्या प्रकृतीविषयी विचारले असता, डॉक्टर त्यांच्यावर उपचार करीत आहेत. त्यांना सद्य स्थितीत रुग्णालयातच ठेवण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. तसेच शक्य तितका आराम करण्यासही डॉक्टरांनी बजावल्याने लग्न सोहळा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याचे स्मृतीच्या कुटुंबियांनी सांगितले.

## ४९८ दिवस टीमबाहेर, निवड समितीने हलक्यात घेतले, पण पठ्ठ्याचे बॅटने उत्तर

दिल्ली-येत्या ३० नोव्हेंबर २०२५ भारत आणि साऊथ आफ्रिका यांच्यातील वनडे मालिकेला सूरूवात होणार आहे.या मालिकेसाठी साऊथ आफ्रिकेने वनडे संघाची घो-षणा केली होती. या घोषणेनंतर आता टीम इंडियाने वनडे संघाची घोषणा केली आहे. या संघात मराठमोळ्या खेळाडूची एंन्ट्री झाली आहे. या खेळाडूने साऊथ आफ्रिकेविरूद्ध सराव सामन्यात उत्कृष्ट खेळी केली होती.त्याचच बक्षीस आता त्याला मिळाले आहे.

हा खेळाडू दुसरा तिसरा कुणी नसून ऋतुराज गायकवाड आहे. ऋतुराज गायकवाड हा मागच्या दीड वर्षापासून टीम इंडियाच्या बाहेर होता. तसेच त्याला दुखापत झाल्यामुळे तो बराच काळ क्रिकेटपासून लांब होता.पण दुखापतींनंतर कमबॅक करताना ऋतुराजने एक शानदार शतक आणि एक अर्धशतक झळकावले होते. पहिल्या सामन्यात ऋतुराजने १२९ बॉलमध्ये ११७ रन केले, ज्यात १२ फोरचा समावेश होता. तर दुसऱ्या सामन्यात त्याने ९ फोरच्या मदतीने ८३ बॉलमध्ये नाबाद ६८ रन केले.

भारताने सीरिजमधले दोन सामने जिंकले आणि दोन्ही विजयांमध्ये ऋतुराज गायकवाडने उल्लेखनीय कामगिरी केली, त्यामुळे त्याला प्लेअर ऑफ द मॅच देऊन गौरवण्यात आले.

## दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा, केएल राहुल कर्णधार



मुंबई-आगामी दक्षिण आफ्रिका विरुद्ध तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. सलामीवीर शुभमन गिल मानेच्या दुखापतीमुळे पूर्णतः बरा न झाल्याने या मालिकेतून बाहेर राहणार आहे. त्याच्याऐवजी केएल राहुल विकेटकीपिंगसोबतच संघाचे नेतृत्व देखील करणार आहे. संघात दुसरा विकेटकीपर म्हणून ऋषभ पंत खेळणार आहे. तर मुख्य वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला देखील विश्रांती देण्यात आली आहे. श्रेयस अय्यरलाही दुखापतीमुळे संधी मिळू शकली नाही.युवापिढीचा आक्रमक फलंदाज ऋतुराज गायकवाड दक्षिण आफ्रिका अ विरुद्धच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर पुन्हा भारतीय संघात दमदार कमबॅक केला आहे. त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपली जबरदस्त कामगिरी सादर करून निवडकर्त्यांचे लक्ष वेधले.संघात अनुभवी फलंदाज रोहित शर्मा, विराट कोहली, यशस्वी जयस्वाल यांसारखे खेळाडू आहेत, तर तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी, ध्रुव जुरेल, हर्षित राणा यांसारखे तरुण खेळाडू संघात चमक दाखवणार आहेत. ऑलराउंडर्स रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव संघाचा बॅलन्स अधिक मजबूत करतील. बॉलिंगच्या जबाबदाऱ्या प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग यांच्यावर राहणार आहेत.दक्षिण आफ्रिका विरुद्धच्या आगामी तीन वनडे सामन्यांसाठी घोषणा झालेल्या भारतीय संघात फलंदाजांमध्ये रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, विराट कोहली, तिलक वर्मा आणि ऋतुराज गायकवाड यांचा समावेश आहे. केएल राहुल संघाचा कर्णधार असून त्याचबरोबर विकेटकीपिंगची जबाबदारी पार पाडणार आहे, तर ऋषभ पंत दुसरा विकेटकीपर म्हणून संघात आहे. ऑलराउंडर खे-ळाडूंमध्ये रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर आणि कुलदीप यादव यांचा समावेश आहे, तर गोलंदाजीच्या विभागात प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग, हर्षित राणा, ध्रुव जुरेल आणि नितीश कुमार रेड्डी यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी असेल.

वनडे मालिकेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे-पहिला सामना ३० नोव्हेंबरला रांची येथे, दुसरा सामना ३ डिसेंबरला रायपूर येथे आणि तिसरा सामना ६ डिसेंबरला विशाखापट्टणम येथे खेळवला जाणार आहे.



# काटगाव जि.प मधून पूर्वादेवी देशमुख यांची तर तांदूळजा मधून दिपक वांगस्कर यांना भाजपाची उमेदवारी जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण मंडळाच्यावतीने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा जिल्हा परिषद गटाचा भाजपाच्या विजयाचा संकल्प मेळावा शुक्रवारी झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विष्णूआप्पा मोहिते हे होते तर या मेळाव्यास भाजपाच्या नेत्या डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते नाथसिंह देशमुख, संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर, उद्धव काळे, मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, सतीश आंबेकर, पद्माकर चिंचोलकर, योगीराज साखरे, श्याम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ यांच्यासह इतर अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यास तांदूळजा जिल्हा परिषद मतदार संघातील अनेक गावागावातील भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ कराड यांचे तांदूळजा गावात आगमन होताच ढोल ताशाच्या गजरात फटाक्याच्या आतिषबाजीने जेसीबीतून फुले उधळून जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी



बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मांजरा परिवाराने पहिल्यांदाच उसाचा भाव जाहीर केला, देणार आहेत की नाही माहित नाही. पाच वर्षात बावीशे, पंचेवीशे, सत्तावीशे दिला. गेल्या पाच वर्षात साखरेचा भाव सारखाच असताना आत्ताच ऐकतीशे का भाव जाहीर केला असा प्रश्न उपस्थित करून आत्तापर्यंत झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम विधानसभेतील विजयातून झाले. ही तुमच्या मताची किंमत आहे. अनेक पुरस्कार घेणारे मांजरा परिवारातील कारखाने तोट्यात का आहेत कर्जबाजारी का झाले असा प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक दिली पाहिजे यासाठी माझा संघर्ष असल्याचे बोलून दाखवले.

केंद्रात नरेंद्रजी मोदी आणि राज्यात देवेंद्रजी यांच्या नेतृत्वातील शासनाने अनेक कल्याणकारी योजना राबवून खरा विकास काय असतो हे दाखवून दिले. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना योजना देण्याचे काम केले. मात्र काँग्रेस राजवटीत बागायतदारांना घरकुले मिळाली मात्र गरजू गरिबांना घरकुल मिळाले नाही गरिबांना गरीबच ठेवण्याचे पाप केले गेल्या चाळीस वर्षात सत्तेचा उपयोग स्वतःसाठी आणि कुटुंबासाठीच केला असल्याचा आरोप करून विधान परिषदेच्या चार आणि विधानसभेच्या एक अशा गेल्या पाच वर्षात आमदार म्हणून लातूर ग्रामीण मतदारसंघात बाराशे ते तेराशे कोटी रुपयाची विकास कामे केली असल्याचे सांगून पंधरा वर्षीत काँग्रेस आमदाराने काय विकास केला कोणत्या गावाला किती निधी दिला असा प्रश्न आ रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलताना उपस्थित केला.

ज्यांची केंद्रात आणि राज्यात सत्ता आहे त्यांचीच जिल्ह्यात आणि तालुक्यात सत्ता असेल तर ग्रामीण भागाचा विकास होतो असे विलासरावजी सांगत होते तेच मी आज सांगतोय, भाजपाच्या नेतृत्वातील केंद्रात मोदीजींची आणि राज्यात देवेंद्रजींची सत्ता आहे ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी, विकासासाठी येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाला बहुमताने विजयी करावे असे आव्हान करून आ रमेशआप्पा कराड यांनी काटगाव जिल्हा परिषद गटातून पूर्वादेवी नागसिंह देशमुख यांची तर तांदूळजा गटातून दीपक वांगस्कर यांची आणि तांदूळजा गणातून सुचिता अंकुश गणगे गादवड गणातून बाबा भिसे यांची उमेदवारी जाहीर केली.

विरोधकांना खात्री नसल्याने अगोदर संकल्प मेळावा घेतात नंतर विजयी मेळावा घेतात मात्र जनतेच्या आशीर्वादाने लातूर ग्रामीण मतदार संघातील सर्व जागेवर जनतेच्या आशीर्वादाने भाजपाचा विजय होणार याची रमेश आप्पांना खात्री असल्यानेच आजचा विजयी संकल्प मेळावा होत असल्याचे सांगून भाजपा नेत्या डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, आप्पांच्या पंखाखाली सुरक्षितता आणि विकास असल्याने अनेक जण भाजपात मोठ्या संख्येने येत आहेत आप्पा सोबत चे नाते अधिक दृढ करण्यासाठी जिल्हा परिषद पंचायत समितीची निवडणूक असून भाजपाच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करावे आपला विजय आणि संकल्प हा केवळ कमळच आहे. यावेळी बोलताना नाथसिह देशमुख म्हणाले की, लातूर ग्रामीण मतदार संघातील प्रत्येक गावातील अडचणीची जाण असणारे नेते रमेशआप्पा कराड हेच आहेत त्यांनी रस्ते, नाल्या, पाणी, दिवाबत्ती, विविध मंदिराचा जिर्णो द्धार यासह सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला मंदिराच्या सभागृहाबरोबरच मंदिरातल्या भजनी मंडळांनाही मदत केली. येणाऱ्या काळात आप्पाना साथ द्या, भाजपाला विजयी करा असे आवाहन केले. याप्रसंगी दीपक वांगस्कर, प्रशांत नानजकर, महादेवआबा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करून येणाऱ्या निवडणुकीत मतदार भाजपा सोबत असल्याचे बोलून दाखवले तर भैरवनाथ पिसाळ यांनी आ रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली. सभेचे सूत्रसंचालन शाम भोळे यांनी केले तर शेवटी सचिन कांबळे यांनी आभार मानले. भाजपाच्या विजयी संकल्प काटगाव येथील मेळाव्यास भाजपाचे रामहरी भिसे, अशोकराव नानजकर, संभाजी वायाळ, अंकुश गंणगे, नुरखा पठाण, चंद्रकांत वांगस्कर, बापूराव बिडवे, साहेबराव कदम, अशोक सावंत, सचिन हिंगे, विष्णू पाटील, बापूराव देवकर, धनराज शिंदे, तानाजी ढोबळे, शहानुर बागवान, शुभम खोसे, बालासाहेब कदम, महेश कणसे, लता भोसले, शंकर चव्हाण, सिद्राम चव्हाण, विष्णू कसबे यांच्यासह काटगाव जिल्हा परिषद मतदार संघातील अनेक गावा गावातील वाडी वस्तीतील भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत.

## राष्ट्रवादीचा नगराध्यक्षसह सर्व नगरसेवक निवडून द्या निधीची कमतरता पडणार नाही – सहकार मंत्री ना. पाटील



**अहमदपूर/प्रतिनिधी** :राष्ट्रवादीचा नगराध्यक्षससह सर्व नगरसेवक निवडून द्या शहराला निधीची कमतरता पडणार नाही, अहमदपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून शहरातील नगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार अभय मिरकले यांच्यासह इतर २५ उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व रिपाई युतीच्या सर्व उमेदवारांचा सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील राष्ट्रवादी संपर्क कार्यलयापासून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला यावेळी ना. पाटील बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, माजी उपनगराध्यक्ष मुजीब पटेल रिपाई नेते, बाबासाहेब कांबळे, शहराध्यक्ष अझहर बागवान, नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार अभय मिरकले सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की, अहमदपुर शहराला आवश्यक सर्व सुख सुविधा देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला असून, येणाऱ्या काळात सुद्धा अहमदपुर शहराला स्मार्ट सिटी करून सर्व आवश्यक सुविधा देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ना. पाटील म्हणाले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेंगणे, मुजीब पटेल, बाबासाहेब कांबळे, अभय मिरकले, यांनी समयोचीत मनोगत व्यक्त केले.

अहमदपूर शहरात या प्रचार रॅलीचे स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व उमेदवार उपस्थित होते.

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने पंढरपूर येथे बहु-विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



**सोलापूर/प्रतिनिधी** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २१ नोव्हेंबर २०२५ रोजी पंढरपूर येथील पॉलीक्लिनिक रुग्णालयात बहु-विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन केले. सोलापूर विभागाच्या वैद्यकीय विभाग, पॉलीक्लिनिक पंढरपूर यांनी लाईफलाइन मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल आणि महालॅब यांच्या सहकार्याने संयुक्तपणे हा उपक्रम आयोजित केला होता.

या शिबिराला रेल्वे कर्मचारी, निवृत्त कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला, एकूण ११० लाभार्थ्यांना आवश्यक वैद्यकीय सेवा मिळाल्या. रक्त तपासणी आणि नियमित आरोग्य तपासणी सेवांसह डॉक्टर, ऑर्थोपेडिक, नेत्ररोग आणि स्त्रीरोग सल्लामसलत यासह विस्तृत आरोग्य सुविधा प्रदान करण्यात आल्या. लाभार्थ्यांनी वजन आणि जीवनावश्यक अवयवांचे मूल्यांकन, यादृच्छिक रक्तातील साखरेची चाचणी, रक्तदाब देखरेख आणि ईसीजी तपासणीचा देखील लाभ घेतला.

मुख्य वैद्यकीय अधीक्षक (सीएमएस) डॉ. मंजुनाथ आणि अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक (एसीएमएस) डॉ. कृष्णा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात डॉक्टर डॉ. मंजुनाथ, ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. रथन, नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. देवीलाल आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. भावना यांच्यासह अनुभवी तज्ञांची टीम होती. त्यांच्या कौशल्यामुळे आणि वचनबद्धतेमुळे प्रत्येक उपस्थितांना संपूर्ण वैद्यकीय मदत आणि वैयक्तिक मार्गदर्शन मिळाले. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रभावीपणे संचालन मुख्य नर्सिंग अधीक्षक श्री राहुल गंबारे यांनी केले, ज्यांनी संपूर्ण कार्यक्रमात सुरळीत कामकाज सुनिश्चित केले. उद्घाटन सत्रादरम्यान, सीएमएस डॉ. मंजुनाथ यांनी व्यायाम, योग आणि प्रतिबंधात्मक काळजीद्वारे निरोगी जीवनशैली राखण्याचे महत्त्व अधोरेखित करणारे एक अंतर्दृष्टीपूर्ण आरोग्य शिक्षण भाषण देखील दिले.

पडद्यामागे, मुख्य फार्मासिस्ट श्री. किरण कदम, डॉ. भावना आणि पॉलीक्लिनिक पंढरपूरचे वरिष्ठ नर्सिंग अधीक्षक श्री. अजय कृष्णन यांच्यासह सूक्ष्म समन्वयाने शिबिर सुरळीतपणे चालले याची खात्री केली. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांनी कार्यक्रमाच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान दिले, सर्व लाभार्थ्यांना सकारात्मक आणि संघटित अनुभव दिला.

आरोग्य तपासणी शिबिराचा समारोप उपस्थितांकडून मोठ्या प्रमाणात कौतुकाने झाला, ज्यामुळे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या एकूण कल्याणासाठी सोलापूर विभागाच्या समर्पणाला पुष्टी मिळाली. अशा उपक्रमांद्वारे, विभाग रेल्वे कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सुलभ आणि उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे पालन करत आहे.

## श्रीनिवास आकनगिरे यांच्यासह अनेकांचा आ. कराड यांच्या उपस्थितीत भाजपात जाहीर प्रवेश



**लातूर/प्रतिनिधी** :रेणापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्रीनिवास आकनगिरे यांच्यासह अनेकांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. रेणापूर नगरपंचायत निवडणूकीत भाजपाचा बहुमताने विजय सूर्यप्रकाशा इतका सत्य असून या प्रवेशाने मताधिक्यात निश्चितपणे वाढ होणार आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून रेणापूर शहरासह संपूर्ण लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गावागावात मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून विकास कामांना गती दिली आहे. विकास निधी काय असतो विकास कामे काय असतात हे केवळ रमेशआप्पांच्या माध्यमातून ग्रामीण जनतेला उमजले आहे. होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन मतदार संघातील अनेक जण भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत.

रेणापूर नगरपंचायतीच्या माध्यमातून तब्बल ८० ते ९० कोटी रुपयांची विकास कामे आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मंजूर झाल्याने नगरपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या संपूर्ण पॅनलचा विजय निश्चित मानला जात आहे. निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि रेणापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती श्रीनिवास अकनगिरे यांच्यासह सुरेश उरगुंडे, भास्कर तेरकर, अमर आकनगिरे, शुभम भांबरे, अमोल मद्दे, अनिल मामडगे, गंगाधर आकनगिरे, विनोद चन्नागिरे, सुशांत वंगाटे यांच्यासह अनेकांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांच्यासह अनेक उपस्थित होते.

## ३०० किलो सिंगल युज प्लास्टिकचा साठा जप्त ;मनपाच्या पथकाची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या एका पथकाने शनिवारी (दि. २२) गंजगोलाई परिसरातील एका गोडाऊन वर छापा टाकून अंदाजे ३०० किलो सिंगल युज प्लास्टिकचा साठा जप्त केला. संबंधितास ५ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला. सिंगल युज प्लास्टिकच्या वापरास बंदी आहे.असे असतानाही काही लोक प्लास्टिकचा वापर करत असल्याचे निदर्शनास आल्याने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उपायुक्त श्रीमती वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी रवी कांबळे यांच्या पथकाने छापा मारून ही कारवाई केली. सिंगल यूज प्लास्टिक आरोग्यास हानिकारक आहे.अशा प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणाची हानी होते. याशिवाय मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो.हे प्लास्टिक गटारी मध्ये अडकून पाणी तुंबते. कचऱ्यातील प्लास्टिक जनावरांनी खाल्ले तर त्यांच्या आरोग्यासाठी ते अपायकारक ठरते. त्यामुळे या प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. व्यावसायिक आणि नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर करू नये.यापुढे बंदी असणाऱ्या प्लास्टिकचा वापर केल्याचे आढळले तर ते जप्त करून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे. या कारवाईत मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे,अक्रम शेख,स्वच्छता निरीक्षक प्रदीप गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.



## रेणापुर येथील काँग्रेस उमेदवारांनी घेतल्या मतदारांच्या भेटी

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने नगरअध्यक्ष पदासह सर्व वॉर्डातून चारित्र्य संपन्न व जनतेच्या प्रश्नांची जाण असलेले उमेदवार दिले आहेत. निवडणूक प्रचारामध्ये काँग्रेस पक्षाने आघाडी घेतली असून जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील असा ठाम विश्वास रेणापुरकर व्यक्त करत आहेत.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी वार्ड क्रमांक १ मधील उमेदवार काळे प्रदीप सुधाकर,वॉर्ड क्रमांक ३ मधील उमेदवार अकनगिरे पूजा प्रशांत, वॉर्ड क्रमांक ९ मधील उमेदवार पठाण यास्मिन रहीमखॉ यांनी वार्डातील प्रत्येक घरात जाऊन मतदारांच्या भेटी घेत संवाद साधला.

## उज्ज्वल भवितव्यासाठी कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करावे-प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे डी.फार्मसी,बी.फार्मसी आणि एम.फार्मसी प्रथम वर्षात प्रवेशित २६४ विद्यार्थ्यांसाठी स्टुडन्ट इंडक्शन व नवोदित विद्यार्थी स्वागत समारंभ संपन्न झाला. प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी नवं प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करुन फार्मसी क्षेत्रातील उज्ज्वल भवितव्यासाठी कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करावे. रोजगारक्षम बनण्यासाठी प्रवेशाच्या पहिल्या वर्षापासूनच प्रयत्नांची सुरुवात करावी,असे सांगितले. प्राचार्यांनी या प्रसंगी महाविद्यालया बद्दल व महाविद्यालयातील विविध उपक्रमां बाबत सखोल माहिती दिली.




महाविद्यालयाचे शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ.समीप सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्राबद्दल व फार्मसी अभ्यासक्रमा बाबत माहिती देत कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले,तसेच फार्माकोलॉजि चे विभाग प्रमुख डॉ. वडूळकर रघुनाथ यांनी रोगनिदान व उपचार पद्दती याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. फार्मासुटिक्स चे विभाग प्रमुख प्रा.रोहित सारडा यांनी फार्मासुटिकल इंडस्ट्री व त्या मधील संधी तसेच ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे कार्य या बद्दल उपयुक्त माहिती दिली. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.गोपाल लोहिया यांनी महाविद्यालय मार्फत घेण्यात येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांबाबत तसेच अलुमिनि असोसिएशन आणि त्यांच्या मार्फत राबविले जाणारे विविध उपक्रमां बाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरूवातीस दयानंद शिक्षण संस्था व दयानंद फार्मसी महाविद्यलयाची माहीतीपुर्ण चित्रफीत दाखविण्यात आली,त्यानंतर प्रा.काजल घोडके,प्रा.संदीप क्षीरसागर,प्रा.तृप्ती राजमान्य यांनी डी.बी.आणि एम.फार्मसी च्या परीक्षा पद्धती व गुणांकना बद्दल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील डी.फार्म,बी.फार्म व एम.फार्म चे सर्व विद्यार्थी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.नरेश हलके यांनी केले.

## साने गुरुजी विद्यालयात नशा मुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील अवंती नगर भागातील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी नशा मुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना नशा विरोधी शपथ देण्यात आली. समाज आणि देशाच्या विकासात युवा पिढीचा वाटा महत्त्वाचा असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नशा विरोधी जनजागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.



या प्रसंगी सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी सामूहिक हिंदी आणि इंग्रजी भाषेत शपथ घेतली. शपथेत नमूद केल्याप्रमाणे स्वतः, मित्र, कुटुंब आणि समाजाला नशे पासून दूर ठेवण्यासाठी कटिबद्ध राहू व बदलाची सुरुवात स्वतःपासून करू, असा दृढ निर्धार विद्यार्थ्यांनी घेतला.

विद्यार्थ्यांमध्ये नशा विरोधी जनजागृती, जबाबदारी आणि सकारात्मक सामाजिक मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख, शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातूर जिल्ह्यात 'टॉय बँक' उपक्रमाला गती

## मुख्यमंत्र्यांचे प्रोत्साहन; राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीला बळ

**लातूर/प्रतिनिधी :** कमी उत्पन्न गटातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार मूल्याधारित शिक्षण व निर्धारित लर्निंग आउटकम्सची पूर्तता करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रोत्साहनातून लातूर जिल्ह्यातील शाळांमध्ये ओपन ट्री फाउंडेशनच्या 'टॉय बँक' (Toybank's Life Skills Play Programmes) उपक्रमाला गती दिली जाणार आहे. या उपक्रमातून खेळाद्वारे शिक्षण पद्धतीने मुलांमध्ये संवादकौशल्य, नेतृत्व, सर्जनशीलता, समस्या निराकरण, तणाव व्यवस्थापन, सकारात्मक विचारसरणी, सहानुभूती, जबाबदारी आणि सामाजिक जाणीव यांसारखी मूल्ये रुजवली जाणार आहेत.






राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये ३ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी खेळ-आधारित शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. हे धोरण कृतीत उतरविण्यासाठी ओपन ट्री फाउंडेशनचा 'टॉय बँक' उपक्रम उपयुक्त ठरत आहे. त्याचबरोबर या उपक्रमातून मोठ्या वयोगटातील मुलांनाही जीवन कौशल्ये (लाईफ स्कील) आणि मूल्याधारित शिक्षणाचे धडे दिले जात आहेत. लातूर जिल्ह्यात हा उपक्रम जलदगतीने राबवावा, यासाठी ओपन ट्री फाउंडेशनच्याला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

सध्या लातूर जिल्ह्यात १४० शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जात असून १३ हजार २०० विद्यार्थ्यांचा यामध्ये सहभाग आहे. लवकरच या उपक्रमाची व्याप्ती वाढवून जास्तीत जास्त शाळांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. प्रत्येक शाळेला ३० ते ३५ खेळणी, तेथील शिक्षकांना खेळाद्वारे शिक्षणाचे प्रशिक्षण निःशुल्क देण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील शासकीय व निमशासकीय शाळांतील मुलांमधील सर्जनशीलता, समस्या निराकरण, मानसिक आरोग्य, भावनिक स्थैर्य, संवाद कौशल्य, सामाजिक जाणीव आणि शैक्षणिक प्रगतीसाठी खेळ-आधारित कार्यक्रमांची मदत होणार आहे.

# स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती अभियान रॅली व पथनाट्य

**उदगीर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक -२०२५ मध्ये मतदान करणे कामी नागरीकांमध्ये जनजागृती करून मतदानाचे प्रमाण वाढवावे या अनुषंगाने SVEEP अंतगर्त मतदान जनजागृती करिता विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे बाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्या नुसार सुशांत शिंदे- उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उदगीर नगरपरिषद, सोमनाथ जाधव - मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व राम बोरगावकर -तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार शहरातील नागरिकांमध्ये नगरपरिषदेच्या मंगळवार दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० या दरम्यान होणाऱ्या निवडणुकीत नागरिकांनी शंभर टक्के सहभाग नोंदवून मतदान करावे या हेतूने या रॅलीचे व पथनाटयाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम सर्व मान्यवरांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करून याठिकाणी नगरपरिषदेचे कर निर्धारक व प्रशासकीय अधिकारी बालाजी शेटे यांनी मतदार जनजागृतीपर गीत सादर केले. त्यानंतर पोस्ते पोदार शाळेच्या विद्यार्थ्यांनी मतदार यांनी मतदान करून आपले कर्तव्य व जबाबदारी पार पाडावी या विषयाचे पथ नाट्य सादर केले. त्यानंतर सुशांत शिंदे- उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उदगीर नगरपरिषद, सोमनाथ जाधव - मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी व राम बोरगावकर -तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, पोस्ते पोदार शाळेचे संचालक सुरज पोस्ते, यांनी रॅलीची सुरुवात हिरवी झेंडी दाखवून केली सदर रॅलीचा मार्ग डॉ भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक - नगरपरिषद कार्यालय - छत्रपती शिवाजी महाराज चौक - उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे समारोप करण्यात आला. नगरपरिषद कार्यालयासमोर विद्यार्थ्यांनी मतदार राजा जागा हो - लोकशाहीचा धागा हो या विषयावर मतदार जनजागृती हेतूने पथ नाट्य सादर केलं.

सदर कार्यक्रमच्या यशस्वितेसाठी नगरपरिषदेचे अधिकारी कर्मचारी राधा जमाले, शिवशंकर मटके, मिसबा सिद्धीकी, प्रफुल अदावळे, विशाल गुडसूरकर, महारुद्र गालट, महसूल सहाय्यक विशाल कदम, यांच्यासह पोस्ते पोदार शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारी आदी मेहनत घेतली.

# औसा विकासाच्या मार्गावर, विकासाला गती देण्यासाठी साथ द्या - आ. अभिमन्यू पवार

## औसा नगर निवडणुकीत युतीच्या रॅली-बैठकींना उत्स्फूर्त प्रतिसाद

**औसा/प्रतिनिधी :** औसा उपजिल्हा रुग्णालयाच्या १०० खाटांच्या इमारतीचे काम वायुवेगाने सुरू असून औसेकरांना सर्व उपचार मोफत मिळणार असल्याची माहिती त्यांनी दिली. २० वर्षांची माकणी पाण्याची मागणी पूर्ण झाली असून शहरातील रस्ते-नाली बांधकामांची कोट्यवधींची कामे पूर्णत्वास गेल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. औसा शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी युतीला साथ द्या,असे आवाहन आमदार पवार यांनी औसा येथील कॉर्नर बैठकीत केले आहे.

भाजप-शिवसेना-रिपाइं युतीच्या प्रचार मोहिमेला औसा शहरात मोठी गती मिळत असून प्रभाग ९ आणि प्रभाग २ मधील रॅली व कॉर्नर बैठका उत्साहात पार पडल्या.या बैठकीत आमदार अभिमन्यू पवार, युतीचे अध्यक्षपदाचे उमेदवार डॉ. ज्योती महादेव बनसुडे तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार फातेमा उमर पंजेशा व इळेकर सोमनाथ गुरुपदप्पा उपस्थित होते.यावेळी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले औसा उपजिल्हा रुग्णालयाच्या १०० खाटांच्या इमारतीचे काम वायुवेगाने सुरू असून औसेकरांना सर्व उपचार मोफत मिळणार असल्याची माहिती त्यांनी दिली. २० वर्षांची माकणी पाण्याची मागणी पूर्ण झाली असून शहरातील रस्ते-नाली बांधकामांची कोट्यवधींची कामे पूर्णत्वास गेल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. औसा शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी युतीला साथ द्या, असे आवाहन केले आमदार पवार यांनी केली.



दरम्यान, प्रभाग २ मध्ये युतीची रॅली काढण्यात आली. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रॅलीत उत्साह ओसंडून वाहत होता. या रॅलीत आणि कॉर्नर बैठकीत अध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. ज्योती बनसुडे यांच्यासह उमेदवार सुनील सिद्रामप्पा मिटकरी आणि सौ. ऐश्वर्या पवनराज राचट्टे यांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेळी आमदार पवार यांनी मुक्तेश्वर रस्ता, त्यालगतची नाली, दूरसंचार कार्यालयासमोरील रस्ता, अन्नपूर्णा नगर रस्ता यांसह प्रभागातील रस्ते, नाली, गटारी आणि मूलभूत सुविधांची एकूण ७८ कामे पूर्ण झाल्याचे सांगितले. अल्प प्रलंबित कामे निवडणुकीनंतर तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.औसा शहरात ५०० कोटींपेक्षा अधिकची विकासकामे झाल्याचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की प्रत्येक प्रभागात विकासाची चिन्हे पाउलोपाउली दिसत आहेत. औसेकर विकासाच्या मुद्यावर युतीला नक्कीच जनाशीर्वाद देतील, असा त्यांना विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले.

## लढत ..

दिले नाही तिकीट
का बसायचे कुढत
बंडखोरी महाउत्तम
सरळद्यायची लढत

नंबर माझा लागेना
कैक काढली सोडत
त्यांचे लाडके सगळे
जागाचं नाही सोडत

नव्यांना देतात संधी
नाव माझे ना काढत
बाकीचे तुडुंब जेवले
पंगती बसलो वाढत

डबक्यात बसे बेडूक
भोवती शेवाळे सडत
पक्षविस्तारले आम्ही
चिखलात गाडेओढत

आता मात्र कुणाचेही
ना आम्हांविना अडत
दलाली पुरवत त्यांना
वसुली करतो आडत

गिधाडे घोंगावी नभी
बसतातलचके तोडत
मिरवणूक त्यांची रंगे
बसे सारे रस्ते झाडत

आता उभे राही मुक्त
रथी महारथी भिडत
सोडे स्वभाव भिडस्त
सिंहासनी घेऊ बढत

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस आघाडीच्या प्रचाराची जोरदार चर्चा

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीत काँग्रेस पक्षाने प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र दिसून येत आहे. जनतेच्या प्रश्नांची जाण असलेल्या उमेदवारांमुळे मतदारांतून काँग्रेसला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचा दावा केला जात आहे.मागील काळात सत्तेवर असूनही रेणापूरचा कसलाही विकास झालेला नाही, त्यांच्या कार्यकाळात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाने यावेळी स्वच्छ प्रतिमा असलेला प्रामाणिक व रेणापूरच्या विकासाची जण असलेला सर्वपरिचित उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरला आहे. सध्या भाजपच्या ताब्यात असलेल्या रेणापूर नगरपंचायतीतील कारभारावर जोरदार चर्चा सुरू आहे. मागील कार्यकाळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप मतदार करत आहेत. त्याचबरोबर आमदार रमेश कराड यांनी रेणापूर शहरात कागदोपत्री कोटींच्या कामाचे दोन-तीन वेळा नारळ फोडले, परंतु प्रत्यक्षात कामाचा अजूनही पत्ता नाही असाही आरोप केला जात आहे त्यामुळे भाजपसाठी ही निवडणूक आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. प्रहार संघटनेने यापूर्वी मार्च २०२१ मध्ये रेणापूर नगरपंचायतीमधील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी जलकुंभावर आंदोलन केले होते.

**काँग्रेसची मजबूत स्थिती**

काँग्रेसने निवडणुकीसाठी नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा राबवली असून, जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मतदारांच्या या प्रतिसादामुळे रेणापूर नगरपंचायतीत काँग्रेसची सत्ता स्थापन होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. लातूर जिल्ह्यात काँग्रेसने काही ठिकाणी स्वबळावर, तर काही ठिकाणी महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. रेणापूरमध्ये काँग्रेस स्वबळावर लढत आहे.

एकूणच, भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे भाजपनेत्यांच्या विरोधात असलेला रोष आणि काँग्रेसच्या उमेदवारांना मिळणारा प्रतिसाद पाहता, रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेसची बाजू वरचढ ठरत असल्याचे चित्र आहे.

# एंजल वन ने गुंतवणूकदारांना फसवणूक करणारे सोशल मीडिया ग्रुप्स आणि अनधिकृत गुंतवणूक योजनांबाबत केले सतर्क

**पुणे/प्रतिनिधी :** एंजल वन लिमिटेड या फिनटेक क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने गुंतवणूकदारांना एंजल वनच्या नावाचा गैरवापर करून आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे खोटे सांगत फसवणूक करणाऱ्या सोशल मीडिया ग्रुप्सबाबत सतर्क केले आहे.

कंपनीला व्हॉट्सअॅप व टेलिग्राम अशा सोशल मेसेजिंग प्लॅटफॉर्म तयार करण्यात आलेले अनेक अनधिकृत ग्रुप्स निदर्शनास आले आहेत, जे एंजल वन लिमिटेडचे ब्रँड नाव व लोगोचा, तसेच त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावांचा व प्रतिष्ठेचा बेकायदेशीर व फसवणूक करणाऱ्या पद्धतीने गैरवापर करत आहेत. एंजल वन ने ओळखले आहे की फसवणूक करणारे हे ग्रुप्स बेकायदेशीर कृती करत आहेत, जसे आवश्यक सेबी नोंदणी/परवानगीशिवाय सुरक्षिततेसंबंधित सल्ला किंवा शिफारशी देणे, तसेच सेबीच्या मान्यतेशिवाय सिक्युरिटीजशी संबंधित परतावे व कामगिरीबाबत अनधिकृत दावे करणे.

''आम्ही सांगू इच्छितो की, सिक्युरिटीज बाजारपेठेत गुंतवणूकीबाबत अनधिकृत सल्ला देणे किंवा परताव्यांची हमी देणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. आम्ही गुंतवणूकदारांना आमच्या कंपनीकडून असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही संवादाची सत्यता बारकाईने पडताळून पाहण्याचे आवाहन करतो. सखोल संशोधन करत आणि अधिकृत स्रोतांकडून मिळालेल्या माहितीनुसार कायदेशीर गुंतवणूक करण्याचा निर्णय घ्यावा. एंजल वन लिमिटेडचा कोणतेही बनावट अॅप्लिकेशन्स, वेब लिंक्स किंवा खाजगी व्हॉट्सअॅप/टेलिग्राम ग्रुप्ससोबत प्रत्यक्षरित्या किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा संबंध नाही आणि फसवणूक करणारे अॅप्लीकेशन्स किंवा वेब लिंक्ससोबत व्यवहार केल्याने होणाऱ्या कोणत्याही आर्थिक नुकसानासाठी किंवा परिणामांसाठी जबाबदार नाही,'' असे एंजल वन ने सांगितले.

एंजल वनने स्पष्टपणे सांगितले की कंपनी अनधिकृत सोशल मीडिया ग्रुप्समध्ये ग्राहकांना सामील करत नाही, मेसेजिंग प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून संवेदनशील वैयक्तिक माहिती देण्याची विनंती करत नाही, अनधिकृत चॅनेल्सच्या माध्यमातून निधी मागत नाही किंवा हमीपूर्ण परताव्यांचे आश्वासन देत नाही. सर्व कायदेशीर व्यवहार फक्त एंजल वनच्या अधिकृत प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून केले पाहिजेत आणि अधिकृत स्रोतांमधून व अधिकृत अॅप स्टोअर्समधून अॅप्लीकेशन्स डाऊनलोड केले पाहिजेत.

एंजल वन गुंतवणूकदारांच्या हितांचे संरक्षण करण्याप्रती आणि सुरक्षित ट्रेडिंग पद्धतींना चालना देण्याप्रती कटिबद्ध आहे. कंपनी सर्व गुंतवणूकदारांना सतर्क राहण्यचे आणि आर्थिक नुकसानापासून संरक्षणासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करते.

सर्वांना अशा कंपन्यांसोबत व्यवहार करण्यापासून दूर राहण्याचा आणि कायदा अंमलबजावणी संस्थांना त्वरित कोणत्याही संशयास्पद क्रियाकलापांची तक्रार करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. तुमच्याबाबतीत कोणताही संभाव्य घोटाळा झाल्यास सायबरक्राइम पोर्टल cybercrime.gov.in च्या माध्यमातून किंवा हेल्पलाइन १९३० शी संपर्क साधत किंवा तुमच्या जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये जाऊन किंवा आम्हाला ceoescalationangelone.in येथे ईमेल करत संबंधित घोटाळ्याची तक्रार करू शकता.

**NAME CORRECTION**

I Mrs. JANABAI SANJAY SHINDE Legally wedded spouse of GS-163681X L/H Adm Sanjay Ramrao Shinde (serving in GREF/BRO) aged 55yrs. Date of birth-15 Jan 1970 Resident of Vill- Gunjarga Teh- Nilanga Dist- Latur State-Maharashtra Pin-413521 have corrected my name as JANABAI SANJAY SHINDE instead of Janabi Baliram Surayvansi Affidavit (GRRegd no. A-2538897) dated 20 Nov 2025 before Judicial Magistrate 1st Class Nilanga Tq Nilanga Maharashtra.

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH HABIB SATTAR TO SHAIKH HABIB ABDUL SATTAR.
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the SHAIKH HABIB ABDUL SATTAR. will used by my family husband /wife, children and relative.
**OLD NAME :**- SHAIKH HABIB SATTAR.
**NEW NAME:**- SHAIKH HABIB ABDUL SATTAR.
**Address :**- KILLA GALLI, MAIN ROAD,SHERKHA GALLI,UDGIR TA. UDGIR. DIST. LATUR.- 413518.
**Adhar no.**-895566830737
**Mob.** No.-9921474777

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM SHAIKH TOHEED MOHAMMAD TO SHAIKH TOHID MOHAMMAD SAB HENCE FROTH THIS DECLERATION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE. SHAIKH TOHID MOHAMMAD SAB IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY CHILDREN AND FAMILY.
**OLD NAME:** SHAIKH TOHEED MOHAMMAD
**NEW NAME:** SHAIKH TOHID MOHAMMAD SAB
**ADDRESS:** SHIVAJI NAGAR NILANGA Dist LATUR ,MAHARASHTRA-413521

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६